रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ९२
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, १८ ऑक्टोबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## 'सीएए' वैधच! सर्वोच्च न्यायालयाचा याचिकेवर निर्णय



**नवी दिल्ली :** नागरिकत्व कायद्याच्या (सीएए) कलम ६ए विरोधात दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला. याची वैधता कायम ठेवण्यात आली आहे. संविधान खंडपीठाचे ४-१ अशा बहुमताने हा निर्णय दिला. ३१ डिसेंबर २०१४पूर्वी पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगलादेशातून धार्मिक आधारावर छळ करून भारतात आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन समुदायातील लोकांना नागरिकत्व दिले जाते. २०१६मध्ये हे दुरूस्ती विधेयक संसदेत मांडण्यात आले होते, मात्र राज्यसभेने त्याला मंजुरी दिली नाही. त्यामुळे मोदी सरकारने दुसऱ्या टर्ममध्ये हे विधेयक मंजूर केले होते. ११ डिसेंबर २०१९ रोजी संसदेने या विधेयकाला मंजुरी दिली. या कायद्याचा भारतीय नागरिकांशी काहीही संबंध नाही. घटनेंतर्गत भारतीयांना नागरिकत्वाचा अधिकार आहे.


### अंतरंग
'आचारसंहितेचे काटेकोर पालन करा'/२
पनवेलच्या उमेदवारीसाठी 'मविआ'त रस्सीखेच/६
'किवीं'नी पहिल्या डावात भारताला गुंडाळले/८


## बाळाराम पाटील यांच्या प्रचार पत्रकातून
# माजी आमदार विवेक पाटील गायब
### बाळाराम पाटील यांचे हे षडयंत्र -भाजप प्रवक्ते ॲड. प्रकाश बिनेदार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेकापचे बाळाराम पाटील निवडणुकीच्या अनुषंगाने प्रचार पत्रक वाटप करीत आहेत, मात्र त्यांच्या या पत्रकावर माजी आमदार विवेक पाटील यांच्या फोटोचा उल्लेख का नाही, असा सवाल भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस व प्रवक्ते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी केला आहे. कर्नाळा बँक घोटाळ्यातून विवेक पाटील यांनी हजारो कुटुंबांच्या आयुष्याचे वाटोळे केले आहे. त्यामुळे त्यांचा उल्लेख निवडणुकीला सामोरे जाताना मोठी अडचण ठरणार आहे, याची जाण बाळाराम पाटील यांना असल्यानेच जाणीवपूर्वक विवेक पाटील यांना डावलण्यात आले आहे, असा सणसणीत टोलाही बिनेदार यांनी लगावला आहे.



बाळाराम पाटील यापूर्वी पनवेल विधानसभा निवडणुकीत सलग दोन वेळा पराभूत झाले. त्यामुळे शिक्षक मतदारसंघातून नशीब अजमावायला गेले एकदा त्यांना संधी मिळाली, पण आमदार होऊनही लोकांचे सोडाच शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यातही ते अपयशी ठरले. त्यामुळे मागील वर्षी झालेल्या शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत बाळाराम पाटील यांचा दारुण पराभव झाला. जनाधार नसतानाही पुन्हा एकदा निवडणुकीला सामोरे जाण्याचा बाळाराम पाटील यांनी प्रयत्न सुरू केला आहे. महाविकास आघाडीतील अनेक पक्ष या ठिकाणी उमेदवार उभा करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. यामध्ये शेकापकडून बाळाराम पाटील यांची अद्याप उमेदवारी निश्चित झाली नसली तरी प्रचार पत्रक वाटून त्यांनी स्वयंघोषित उमेदवारी जाहीर केली आहे, मात्र या पत्रकात शेकापचे नेते माजी आमदार विवेक पाटील यांचा फोटो वगळण्यात आला आहे.

विवेक पाटील यांनी केलेला घोटाळा सहकार क्षेत्राला हादरून सोडणारा आहे. असे असताना ठेवीदारांचे पैसे मिळवून देण्यासाठी शेकापने प्रयत्न केले नाहीत. उलट विवेक पाटील यांना पाठीशी घातले. मोदी केंद्र सरकारच्या विमा कायदा निर्णयामुळे पाच लाखपेक्षा कमी रक्कम असलेल्या ठेवीदारांना पैसे मिळाले, मात्र विवेक पाटील यांचे चिरंजीव व बँकचे संचालक फरार असून त्यांना अटक न झाल्याने पाच लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम असलेल्या तीन हजार ठेवीदारांना अद्याप पैसे मिळाले नाहीत. त्यामुळे उर्वरित ठेवीदारांच्या ठेवींवर टाच आली.

एवढा मोठा घोटाळा करूनही शेकापच्या कार्यक्रमाच्या बॅनरवर घोटाळेबाज विवेक पाटील यांचा फोटो डौलाने झळकायचा, मात्र विवेक पाटील यांचा घोटाळा या निवडणुकीत मोठी अडसर आहे हे विशेषतः बाळाराम पाटील यांना माहीत आहे. त्यामुळे त्यांची कुठेच नोंद घ्यायची नाही, असा निर्धार बाळाराम पाटील यांनी केला असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

आता या बाबीवर सारवासारव करण्याचा प्रयत्न शेकापकडून होईलच, मात्र विवेक पाटील यांच्या फोटोचा उल्लेख बाळाराम पाटील यांना परवडणारा नाही. यामुळेच त्यांनी विवेक पाटलांना आता गोदामामध्ये ठेवण्याचा प्रयत्न केला असेल, मात्र तुम्ही आतापर्यंत रोज बॅनरवर, सोशल मीडियावर विवेक पाटीलांचा फोटो लावत होता. आता निवडणूक काळापुरता त्यांचा फोटो टाळला असला तरी सर्वसामान्य जनता शेकापचा घोटाळा विसरणार नाही. शेकापच्या ज्या ज्या पदाधिकाऱ्यांच्या नावावर कर्ज उचलून भ्रष्टाचार झाला आहे, त्या सर्व आरोपींना एके दिवशी तुरुंगात जावे लागेल याची सर्वसामान्य जनतेला जाणीव आहे. त्यामुळे या निवडणुकीत शेकापचे पाप त्यांच्या पदरात घातल्याशिवाय सर्वसामान्य जनता स्वस्थ राहणार नाही, असेही प्रवक्ते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी म्हटलेय.

## उरणचे माजी आमदार मनोहर भोईर यांना अटक आणि जामिनावर सुटका

**उरण : प्रतिनिधी**

उरणचे माजी आमदार तथा शिवसेना उबाठाचे जिल्हाप्रमुख मनोहर भोईर यांच्यासह सात जणांना २००७च्या सेझविरोधी आंदोलनप्रकरणी बुधवारी अटक करण्यात आली तसेच त्यांची तळोजा कारागृहात रवानगी करण्यात आली होती. त्यानंतर गुरुवारी (दि. १७) दुपारी बेलापूर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला.

शिवसेनेने राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत मनोहर जोशी यांच्या नेतृत्वाखाली सेझ प्रकल्प हटाव या मागणीसाठी कोकणभवन येथील कोकण आयुक्त कार्यालय येथे १६ ऑगस्ट २००७ रोजी आंदोलन केले होते, मात्र या आंदोलनात अनेक वाहनांची तोडफोड झाली होती. या संदर्भात सीबीडी पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद होऊन सरकारी कामात अडथळा केल्याच्या ठपका आंदोलकांवर ठेवण्यात आला होता. यावर तब्बल १७ वर्षे न्यायालयात सुनावणी सुरू होती. या सुनावणीला वारंवार समन्स देऊनही गैरहजर राहत असल्याने संबंधिताना बुधवारी वॉरंट काढण्यात आले होते.

या प्रकरणी माजी आमदार मनोहर भोईर यांच्यासह शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, माजी सभापती विश्वास म्हात्रे, रामचंद्र देवरे, पद्माकर तांडेल व गुरूनाथ पाटील या सात जणांना अटक करून बेलापूर न्यायालयाने कोठडी सुनावली होती.

या सर्वांना गुरुवारी दुपारी बेलापूर न्यायालयाने जामीन मंजूर केला असून तळोजा कारागृहातून संबंधितांची सायंकाळी सुटका करण्यात आली.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी पतंजली योग परिवाराशी संवाद साधला. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, समीर ठाकूर, महिला मोर्चा शहराध्यक्ष तथा माजी नगरसेविका राजश्री वावेकर, योग परिवाराचे रामप्रसाद यादव आदी उपस्थित होते.**



## भारतीय विमानांमध्ये बॉम्ब ठेवल्याच्या धमक्या; उच्चस्तरीय चौकशी सुरू

**नवी दिल्ली :** गेल्या चार दिवसांपासून भारतीय विमानांमध्ये बॉम्ब ठेवण्याच्या धमक्या येत आहेत. विस्तारा आणि इंडिगो कंपनीच्या विमानांनाही (दि. १७) सोशल मीडियाच्या माध्यमातून बॉम्बच्या धमक्या मिळाल्या होत्या. धमकी मिळाल्यानंतर विस्ताराच्या फ्रँकफर्ट-मुंबई फ्लाइट यूके ०२८चे मुंबईत आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. बॉम्बच्या धोक्याची माहिती अधिकाऱ्यांनी क्रूला दिली तेव्हा विमान पाकिस्तानी हवाई हद्दीत उड्डाण करत होते. विमानात १४७ प्रवासी होते. लँडिंग केल्यानंतर विमान विलगीकरणात नेण्यात आले, जिथे सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवण्यात आले. यानंतर तुर्कियेहून मुंबईला येणाऱ्या दुसऱ्या विमानाबाबत धमकी देण्यात आली. दरम्यान, देशातील स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय प्रवासामध्ये विमानांना बॉम्बच्या सलग धमक्या मिळाल्यानंतर केंद्रीय गुप्तचर संस्थांनी आयपी पत्ते शोधून काढले आहेत. यामध्ये धमक्या लंडन आणि जर्मनीमधून धमक्या दिल्या गेल्या होत्या. या साऱ्याची उच्चस्तरीय चौकशी सुरू आहे.

## निवडक

### मंत्री आदिती तटकरे यांचे फेसबुक अकाउंट हॅक

**मुंबई :** राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांचे फेसबुक अकाउंट हॅक झाले असून त्यावरून आक्षेपार्ह मजकूर पोस्ट करण्यात आला होता. याबाबतची माहिती मिळताच त्यांनी त्या पोस्ट डिलीट केल्या तसेच माझे फेसबुक अकाउंट अज्ञात व्यक्तींकडून हॅक करण्यात आले असून त्यावरून काही आक्षेपार्ह मजकूर पोस्ट केला जात आहे. अशा पोस्टवर व्यक्त होऊ नये. याबाबत मी पोलिसांत रितसर तक्रार दाखल केली असून लवकरच या हॅकर्सचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असे ना. तटकरेंनी म्हटले आहे.

### आता ६० दिवस आधी रेल्वेचे तिकीट होणार बुक

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेमध्ये १२० दिवस आधी तिकीट बुक करण्याचा नियम आहे, मात्र हा नियम बदलण्यात आला आहे. आता केवळ ६० दिवस (प्रवासाचा दिवस वगळता) आधी रेल्वेचे तिकीट आरक्षित करता येईल. रेल्वे मंत्रालयाने याबाबतची अधिसूचना गुरुवारी (दि. १७) जारी केली. हा नवा नियम परदेशी प्रवाशांनाही लागू होणार आहे.

## प्रेमप्रकरणातून चाकणमधील तरुणाची राजमाची दरीत उडी घेत आत्महत्या

**लोणावळा : प्रतिनिधी**

चाकणमधील २७ वर्षीय तरुणाने प्रेमप्रकरणातून लोणावळ्यातील राजमाची दरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. सूर्यकांत रामदयाल प्रजापती या तरुणाचा मृतदेह तब्बल ३७० फूट खोल दरीत आढळला.

धक्कादायक म्हणजे सूर्यकांतने आत्महत्या करण्यापूर्वी अवघ्या दोन सेकंदाचा व्हिडीओ बनवून तो घरी ठेवलेल्या मोबाईलवर पाठवला होता. याच व्हिडीओद्वारे आणि लोकेशन वरून लोणावळा शिवदुर्गच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने मृतदेहाचा शोध घेऊन बाहेर काढला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सूर्यकांत प्रजापती याचे चाकणमधील तरुणीबरोबर प्रेमप्रकरण सुरू होते. सूर्यकांतला त्याच्या प्रेयसीचे दुसऱ्या तरुणाशी प्रेमप्रकरण असल्याचा संशय होता. याच संशयामुळे नैराश्यात असलेला सूर्यकांत ९ ऑक्टोबर रोजी घर सोडून गेला. त्यानंतर तो घरी परतलाच नाही. सूर्यकांत दुसऱ्या दिवशीही घरी न परतल्याने त्याच्या कुटुंबियांनी चाकण पोलीस ठाण्यात तो बेपत्ता असल्याची तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांनी तांत्रिक तपास केल्यानंतर सूर्यकांतचे शेवटचे लोकेशन हे लोणावळा असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सूर्यकांतला शोधण्याचे मोठे आव्हान पोलीस व शिवदुर्गच्या पथकापुढे होते. लोणावळा शिवदुर्ग पथकदेखील यावरून लोकेशनची जुळवाजुळव करत होते. अखेर तो व्हिडीओ राजमाची येथील असल्याचे समोर आले. व्हिडीओमध्ये पाठीमागे दिसत असलेला भाग तिथला असल्याचे स्पष्ट झाले. अखेर पुन्हा शोधमोहीम सुरू केली.

दरीत काही फुटांवर सूर्यकांतचा मोबाईल दिसला. आणखी खाली गेल्यानंतर मृतदेहाची दुर्गंधी आली. मृतदेह त्याचा असल्याचे निश्चित झाले. राजमाची दरीत तब्बल ३७० फुटांवर मृतदेह आढळला. सात दिवसांनंतर सूर्यकांतचा शोध लागला. प्रेमप्रकरणातून त्याने आत्महत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले.

## दिव्यामधील शाळेत ४४ विद्यार्थ्यांना विषबाधा

**ठाणे : प्रतिनिधी**

कळवा येथील एका खासगी शाळेतील ४०हून अधिक विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून विषबाधा झाल्याच्या घटनेला दोन आठवडे होत नाहीत तोच गुरुवारी (दि. १७) दुपारी दिवा येथील आगासन भागातील ठाणे महापालिकेच्या शाळेतील पाचवी ते सहावीच्या वर्गातील ४४ विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून विषबाधा झाल्याचा प्रकार उघडकीस आला.

या मध्यान्ह भोजनात पाल मृत अवस्थेत आढळून आली असून विषबाधा झालेल्या ४४ विद्यार्थ्यांपैकी ३९ मुलांना पोटदुखी आणि उलटीचा जास्त त्रास होऊ लागल्यामुळे त्यांना कळवा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले, तर इतर मुलांनाही उपचारासाठी दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. त्यामुळे हा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

दिवा येथील आगासन भागात ठाणे महापालिका शाळा क्रमांक ८८ आहे. या शाळेत दुपारच्या सत्रातील विद्यार्थ्यांना नेहमीप्रमाणे मधल्या सुट्टीत खिचडी देण्यात आली होती, परंतु या खिचडीतून विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या खिचडीत मृत पाल असल्याचे आढळून आल्याचा दावा येथील स्थानिक रोहिदास मुंडे यांनी केला आहे. हे अन्नपदार्थ खाल्ल्यामुळे ४४ विद्यार्थ्यांना पोटदुखी व उलटीचा त्रास होऊ लागला.

शाळेने तत्काळ याची सूचना महापालिका अधिकाऱ्यांना दिली. माहिती मिळताच ठाणे महापालिकेच्या कळवा रुग्ण्यालयातून डॉक्टरांचे पथक शाळेत पोहचले. त्यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली. त्या वेळी ४४पैकी ३९ मुलांना पोटदुखी आणि उलटीचा सर्वाधिक त्रास होऊ लागल्यामुळे त्यांना तत्काळ कळवा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले, तर इतर मुलांनाही रुग्णालयात दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. त्यामुळे रुग्णालयात उपचार घेणाऱ्या मुलांची संख्या वाढण्याची शक्यता कळवा रुग्णालयाकडून वर्तविण्यात आली आहे. गेल्या दोन महिन्यात दिवा विभागात अशा दोन ते तीन घटना घडल्या असल्याचा दावा रोहिदास मुंडे यांनी केला आहे.



## अवैध दारू वाहतुकीवर करडी नजर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक मोकळ्या, निष्पक्ष, शांततापूर्ण व प्रलोभनमुक्त वातावरणात होण्यासाठी जिल्ह्याच्या रस्ते, सागरी सीमांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे तसेच अवैध मार्गाने होणाऱ्या दारू वाहतुकीवरही करडी नजर ठेवण्याचा निर्णय बुधवारी (दि. १७) बैठकीत घेण्यात आला.



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सीमेलगतच्या जिल्हा क्षेत्रात आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने रायगड, पुणे, सातारा, रत्नागिरी, सोलापूर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे (रायगड), सुहास दिवसे (पुणे), जितेंद्र डुडी (सातारा), कुमार आशीर्वाद (सोलापूर), पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे (रायगड), पंकज देशमुख (पुणे), समीर शेख (सातारा) यांच्यासह राज्य उत्पादन शुल्क विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत प्रामुख्याने कायदा आणि सुव्यवस्था, बेकायदेशीर मार्गाने होणारी सर्व प्रकारची वाहतूक रोखणे, जप्ती याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव पाडू शकणाऱ्या सीमावर्ती भागातील संवेदनशील ठिकाणे ओळखून त्या ठिकाणी प्रतिबंध करण्यासाठी तपासणी नाके असणार आहेत. या माध्यमातून सर्व हालचालीवर देखरेख ठेवण्यात येईल. आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून अमली पदार्थ, दारू, शस्त्रे आणि स्फोटकांसह प्रतिबंधित वस्तूंच्या हालचालींना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. जिल्हा सीमेवरून होणारे दारू व रोकड वाहतुकीचे निर्गमन आणि प्रवेश स्थाने ओळखून त्यावर सर्व संबंधित जिल्हा पथकाने योग्य ती कारवाई करावी, असे या बैठकीत सर्वानुमते ठरले.

निवडणुकीवर प्रभाव टाकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही मालाची वाहतूक करण्यास सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या ट्रकच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्यावर कारवाईचा निर्णय उपस्थित अधिकाऱ्यांनी घेतला. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने पूर्वतयारीची माहिती सादर केली.

## विधानसभा आणि लोकसभा पोटनिवडणूकही इम्तियाज जलील लढणार

**नांदेड : प्रतिनिधी**

एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी मोठी घोषणा केली आहे. ते नांदेडमधून लोकसभा पोटनिवडणूक, तर विधानसभा निवडणूक छत्रपती संभाजीनगरमधून लढणार आहेत.

जलील म्हणाले, एमआयएम हा पक्ष महाराष्ट्रात आल्यानंतर सर्वात जास्त प्रतिसाद आम्हाला नांदेडमध्ये मिळाला होता. आता नांदेडमधून लोकसभा लढण्याची संधी आलेली आहे.

दरम्यान, काँग्रेसकडून दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांचे पुत्र रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यानंतर जलील यांनीही शड्डू ठोकला आहे.

## मुख्यमंत्री माझी शाळा अभियानात रायगड जिल्ह्यातील शाळांची बाजी

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धात्मक उपक्रमाचा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील शाळांनी बाजी मारली आहे.




मुंबई विभागीय शासकीय गटातून खालापूर तालुक्यातील वडगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला असून या शाळेस १५ लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले, तर खासगी गटातून बोर्लीपंचतनच्या श्री मोहनलाल सोनी माध्यमिक विद्यालयाने तिसरा क्रमांक प्राप्त केला. या शाळेला ११ लाखांचे बक्षीस मिळाले.

शासकीय शाळा गटातून माथेरानच्या वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिरला ११ लाख रुपयांचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. द्वितीय खारपाडा जि.प. प्राथमिक शाळा (पाच लाख पारितोषिक), तृतीय कोलमांडले (ता. श्रीवर्धन) जि.प. प्राथमिक शाळेने (तीन लाख) प्राप्त केला.

खासगी शाळा गटातून श्रीराज एज्युकेशन ट्रस्ट सुधागड शाळेचा प्रथम क्रमांक आला असून त्यांनी ११ लाख रुपयांचे पारितोषिक पटकावले. चांगू काना ठाकूर विद्यालय (सीकेटी) नवीन पनवेलने द्वितीय (पाच लाख बक्षीस), पानेड (ता. पेण)च्या आशा किरण इंग्लिश मीडियम स्कूलने तृतीय क्रमांक (तीन लाख) मिळवला. (पान २ वर..)

# पनवेल मनपाने आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर जाहिराती, बॅनर्स हटवले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याच्या अनुषंगाने पनवेल महापालिका क्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी विविध माध्यमांतून प्रदर्शित करण्यात आलेल्या अनधिकृत जाहिराती हटविण्याची कारवाई महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. यामध्ये २०७८ इतक्या मोठ्या संख्येने छोटे-मोठे अनधिकृत पोस्टर्स, झेंडे, बॅनर आणि कटआऊट हटविण्यात आले आहेत.

महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण विभागाच्या नियंत्रणाखाली मोहीम सर्व प्रभागांमध्ये युध्दपातळीवर राबविण्यात आलेली असून संबंधित विभागांचे सहा. आयुक्त यांच्या माध्यमातून शासकीय, सार्वजनिक व खाजगी अशा तिन्ही मालमत्तांवर तसेच जागांवर लावण्यात आलेल्या अनधिकृत राजकीय जाहिराती काढून टाकण्यात आलेल्या आहेत.



खारघरमध्ये एकुण ४०९, नावडेमध्ये ४२२, कळंबोलीमध्ये ३६१, कामोठेमध्ये ४२०, पनवेलमध्ये ४६६ अशा प्रकारे एकूण २०७८ छोटे-मोठे छोटे-मोठे अनधिकृत पोस्टर्स, झेंडे, बॅनर आणि कटआऊट अनधिकृत राजकीय जाहिराती काढून टाकण्यात आल्या आहेत.

पनवेल महापालिकेच्या वतीने विधानसभा निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेचे पालन करताना विनापरवानगी अनधिकृत राजकीय जाहिराती काढून टाकण्याची कारवाई करण्यात आली येणार आहे. यापुढील काळात निवडणूक विभागाची रितसर परवानगी घेऊनच परवानगी दिलेल्या ठिकाणी मान्यता मिळालेल्या आकारात जाहिराती प्रसिध्द कराव्यात अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## नवी मुंबईतही कारवाई

***नवी मुंबई :** आचारसंहितेचा भंग करणाऱ्या अनधिकृत जाहिराती हटविण्याची धडाकेबाज कारवाई महापालिका क्षेत्रात करण्यात आली आहे. यामध्ये १३ ते १६ ऑक्टोबर या चार दिवसांच्या कालावधीत ४४१८ इतक्या मोठया संख्येने छोटे - मोठे अनधिकृत बॅनर्स व होर्डींग हटविण्यात आले आहेत. बेलापूर विभागात ३९१, नेरूळ विभागात ११३९, वाशी विभागात ४४४, तुर्भे विभागात १००५, कोपरखैरणे विभागात ५७१, घणसोली विभागात ३५०, ऐरोली विभागात ३३१, दिघा विभागात १८७ अशा प्रकारे एकूण ४४१८ छोटे -मोठे बॅनर्स व होर्डींग स्वरुपातील अनधिकृत राजकीय जाहिराती काढून टाकण्यात आल्या आहेत.*

# खालापूरमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण संपर्क अभियान, आढावा बैठक

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर कर्जत विधान सभा मतदार संघावर पुन्हा भगवा फडकविण्याचा निर्धार शिवसेना खालापूर तालुका मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण संपर्क अभियान आणि आढावा बैठकीत निर्धार पक्का करण्यात आला आहे. खालापूर तालुक्याच्या भरगच्च भरलेल्या सभागृहात हा निर्धार सर्वांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने महिला भगिनी यांच्यासाठी राबविलेल्या योजनांचा आढावा घेण्यात आला. जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांनी आमदार महेंद्र थोरवे यांनी केलेल्या कामांचा आढावा घेतला. हजारो कोटी रुपयांचा निधी कसा आणला आणि कोणकोणती कामे पुर्ण केली.



याची यादीच वाचली. कर्जत, खालापूर, माथेरान, खोपोली या शहरांसाठी दिलेला निधी हा ऐतिहासिक मिळालेला निधी असुंन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कर्जत येथील स्मारक ते स्वामी समर्थ यांची स्वागत कमानी, पाणी पुरवठा, रस्ते, गटारे, ऐतिहासिक स्मारकाचा सुशोभीकरण, वीपुरवठा, स्वच्छ पाणी यांच्या सह नारी शक्ती वाढीसाठी होत असलेले प्रयत्न अशा अनेक गोष्टींचा अभ्यास पूर्वक आढावा घेतला.

महीला आघाडीच्या शितल डोखले आणि खोपोली महिला शहर प्रमुख प्रिया जाधव यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना आमदार महेंद्र थोरवे यांच्या कामांची स्तुती केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आणि या कार्यक्षम सरकारच्या मदतीने आपण आज पर्यंत दोन हजार नवशे कोटी रुपयांची विकास कामे या मतदार संघात केली असून विरोधी पक्षाने पसरविलेला नरेटिव्ह याला बळी पडू नका, हा देश संविधनावर चालतो, आणि तो चालत रहाणार असे आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगून आपल्याच मुळे मी पुन्हा आमदार होणार आहे, असे म्हटले.

ज्येष्ठ नेते हनुमान पिंगळे, संपर्क प्रमुख विजय पाटील, युवा अधिकारी रोहित विचारे, तालुका प्रमुख संदेश पाटील, शेखर जांभळे, माजी सभापती एच आर पाटील, उप सभापती विश्वनाथ पाटील, निवृत्ती पिंगळे, संजय देशमुख, खालापूर नगराध्यक्षा मोडवे, प्रिया जाधव, महीला संघटीका रेश्मा आंग्रे, संतोष मुंडे, नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी पंचायत समिती सदस्य,सरपंच, माजी सरपंच, विवीध पदाधिकारी, महीला आघाडी, युवा सेना यांच्या सह हजारो शिवसैनिक उपस्थित होते.

या वेळी राष्ट्रवादी, उठाबा शिवसेना आणि इतर पक्षांतील कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी शिवसेनेत प्रवेश केला तर अनेकांची पदांवर निवड करण्यात आली.

## आदईजवळ अपघात; बसचालक जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील आदई तलावाजवळ एनएमएमटी बसला झालेल्या अपघातात बस चालक किरकोळ जखमी झाला असून जिवीतहानी झाली नसल्याची माहिती देण्यात येत आहे.

खांदेश्वर ते नवीन पनवेल असे एनएमएमटी बस (एमएच-४३-पी-९८६२) ही दोन ते तीन प्रवाशांना घेवून ५९ नंबरची बस चालली असताना आदई तलावाजवळ चालकाचा गाडीवरील ताबा सुटून बस ही फुटपाथवर चढली व काही अंतरावर तलाव होता.

सुदैवाने बस ही तलावात उतरली नाही. या अपघातात बस चालक जखमी झाल्याची माहिती मिळते आहे.

# अलिबाग येथील शितोळे आळी मित्र मंडळातर्फे नवदुर्गांचा सन्मान

**अलिबाग : प्रतिनिधी**

जागर मरूआईचा, सोहळा नवरात्रीचा. या अंतर्गत अलिबाग येथील शितोळे आळी मित्र मंडळ तर्फे अलिबाग मधील वेगवेगळ्या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नवदुर्गांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सचिव ॲड. प्रवीण मधुकर ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली दसऱ्याच्या दिवशी नवदुर्गा सन्मान २०२४ हा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या वेळी पुरस्कार प्राप्त नवदुर्गांना मान्यवरांच्या हस्ते एक आकर्षक सन्मान चिन्ह तसेच भेटवस्तू प्रदान करण्यात आले.

डिझायनर लक्ष्मी मुकादम, कॅप्टन कृतज्ञा जनार्दन हाले, इम्प्ल्यूएन्सर अंकिता राऊत, ॲड. जिवीता पाटील, फूड इम्प्लीएन्सर नलिनी मुंबईकर, पोलीस सीमा सावंत, डॉ. राजश्री चंद्रकांत जगताप, वात्सल ट्रस्टच्या शोभा जोशी, समाज कार्यकर्त्या शकुंतला अशोक पाटील इ.ना नवदुर्गा सन्मान २०२४ सन्मानपूर्वक प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सचिव ॲड. प्रवीण मधुकर ठाकूर, ॲड. कविता प्रवीण ठाकूर, रवींद्र मधुकर ठाकूर, नमिता रवींद्र ठाकूर, शिवसेना उभारता युवा सेना जिल्हा प्रमुख अमीर मधुकर ठाकूर, ॲड. काजल अमीर ठाकूर, समीर मधुकर ठाकूर, दर्शना समीर ठाकूर, मिस टीन युनिव्हर्स २०१९ अपूर्वा प्रवीण ठाकूर निशा उमेश ठाकूर, अलिबाग नगराध्यक्ष प्रशांतजी नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, संतोष म्हात्रे, वृषाली ठोसर, अक्षया नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

पेणच्या नेहा पाटील ढोलकीच्या तालावर फेम यांनी आपल्या नृत्याने प्रेक्षकांकडून वाहवा मिळवली, तर शितोळे आळी आणि मित्र मंडळ महिला यांनी सुंदर सामूहिक नृत्य सादर करून उपस्थितांचे मने जिंकली. विविध वेशभूषा करून छोट्या बालकलाकारांनी उपस्थितांच्या टाळ्या मिळालेल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक प्रतिम सुतार केले. पूजा यांनी निवेदन केले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कोरिओग्राफर जयेश पाटील व टीम तसेच अपूर्वा ठाकूर यांनी विशेष मेहनत घेतली.





**पनवेल : राज्यपाल नियुक्त आमदार भाजपचे महासचिव आमदार विक्रांत बाळासाहेब पाटील यांचे त्यांच्या कार्यालयात अभिनव युवक मित्र मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.**



**मुंबई : राज्यपाल नियुक्त आमदार भाजपचे महासचिव आमदार विक्रांत पाटील यांचे मध्यवर्ती कार्यालयात भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य सिद्धार्थ बांठिया, उद्योजक निलेश शिंदे व आशुतोष मुंदडा यांनी अभिनंदन केले.**




**नवी मुंबई : महर्षि वाल्मिकी जयंतीनिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार, समाजविकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे यांच्या हस्ते व लेखाधिकारी मारूती शिंदे व इतर अधिकारी-कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रतिमापूजन झाले.**

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

# अखिल भारतीय विराट कविसंमेलन

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

जनता की पुकार काव्यमंच यांनी मोठ्या स्तरावर्ती ४६वा अखिल भारतीय विराट कविसंमेलन गिरगाव चौपाटीवर खुल्या स्वरूपात झाला.

कवी संमेलन संयोजिका मंजू लोढा आयोजित जिथे पूर्ण भारतातून कविगण आले. हे औचित्य साधुन ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा या हजर होत्या. विशेष अथीती म्हणून व त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत ईट प्ले रीड च्या रजदूतांनी या गौरव सोहळ्यात सहभागी होवून या अभियानाचा आवाज सर्व सामान्यांमार्फत विशेष अतिथींनाही दिला.

या कार्यक्रमांत डॉ. प्रवीण शुक्ला (दिल्ली), डॉ. सुनील जोगी (गाझियाबाद), कविता तिवारी (लखनऊ), सुदीप भोला (जबलपूर), हेमंत पांडे (कानपूर) अशा अनेक कवीची उपस्थिती लाभली. ईट प्ले रीड चा हा उल्लेखनीय प्रयत्न मोठ्या प्रमाणावर समुदायाकडून मान्यता आणि समर्थनास पात्र आहे हे या सर्व मान्यवरांच्या सन्मानाने दिसून येत आहे.

## अतिरिक्त आयुक्तपदी डॉ. अमोल शिंदे यांची नियुक्ती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी डॉ. अमोल शिंदे यांची शासनाकडून नियुक्ती करण्यात आली आहे.

मागील अनेक महिन्यापासून शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्याकडे अतिरिक्त आयुक्त २ या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता.

आता त्यांच्या जागी डॉ. शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.डॉ. अमोल शिंदे यांच्याकडे परिमंडळ २ , अग्निशमन विभाग, सचिव विभाग, विधी विभाग, निवडणूक, क्रिडा व सांस्कृतिक विभाग, वाहन व यांत्रिकी विभाग, उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग, प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण विभाग, जनगणना विभाग, विष्णुदास भावे नाट्यगृह संगणक विभाग, तसेच होल्डिंग पॉन्डस्, मोठे नाले यांची स्वच्छता व गाळ काढणे आदी विभाग सोपवण्यात आले आहेत.

आचारसंहिता लागू होण्यापूर्वी नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून अन्य अधिकारीही प्रतिनियुक्तीने आले आहेत. यामध्ये उपायुक्त नयना ससाणे, सहाय्यक आयुक्त सतिश जाधव, डॉ. श्रीकांत तोडकर यांचा समावेश आहे.

डॉ. श्रीकांत तोडकर यांची बेलापूर विभाग अधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर बेलापूर विभाग अधिकारी प्रबोधन मावाडे यांची तुर्भे विभाग अधिकारी पदी, तुर्भे विभाग अधिकारी भरत धांडे यांची दिघा विभाग अधिकारी म्हणून बदली करण्यात आली आहे.

पान १ वरुन

## मुख्यमंत्री माझी शाळा अभियानात रायगड जिल्ह्यातील शाळांची बाजी

याव्यतिरिक्त तालुकास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय असे क्रमांक शासकीय शाळा व खासगी शाळा स्तरादरम्यान जाहीर केले जातील आणि प्रथम क्रमांकास तीन लाख रुपये, द्वितीय दोन लाख रुपये व तृतीय क्रमांक एक लाख रुपये असे पारितोषिक देण्यात येईल.

रायगड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात या अभियानात शाळा, शिक्षक, विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला. त्या सर्वांचे जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुनिता गुरव यांनी अभिनंदन केले. त्याचप्रमाणे सर्व विभागस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तर विजेत्या शाळांचे कौतुक केले.

# सोसायट्यांमध्ये उभारणार मतदान केंद्र

## सहाय्यक निवडणुक अधिकारी सुचिता भिकाणे यांची माहिती

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली विधानसभा क्षेत्रात यंदा सहा सोसाटयामध्ये मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. मतदान केंद्रावर पर्यावरणाचा संदेश, मतदान जनजागृती अभियान, सेल्फी पाईंट असणार आहे. मतदार नोंदणी वाढविण्यात निवडणूक यंत्रणेला यश आले असून ३० हजार नव्या मतदारांची नोंद झाल्याची माहिती १५० ऐरोली विधानसभा मतदार संघाच्या सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी सुचिता भिकाणे यांनी दिली.



ठाणे लोकसभा मतदार संघातील सहा विधानसभा मतदार संघापैकी सर्वात मोठा मतदार संघ म्हणून ऐरोली विधानसभा क्षेत्र म्हणून ओळखला जातो. येणारी निवडणूक शांततेत पार पाडावी यासाठी पोलीस यंत्रणा, निवडणूक, पालिका कर्मचारी व प्रशासकीय यंत्रणा झाली आहे. चार लाख ८४ हजार ६५२ नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी ४४७ मतदान केंद्र असणार आहेत, अशी माहिती भिकाणे यांनी दिली. मतदानासाठी आलेल्या अपंगांना हाताळण्यासाठी पथक, ज्येष्ठ नागरिकांना येण्या जाण्यासाठी साधने, पाण्याची व वैद्यकीय सुविधा प्रत्येक केंद्रावर असणार आहेत. अग्निशमक दल, पोलिसांचे गस्तीपथक, होर्डिंग काढण्यासाठी अतिक्रमण पथक आतापासूनच कार्यरत असल्याचे भिकाणे यांनी सांगितले. मतदान केंद्रावर पर्यावरणपुरक उपक्रम, प्रबोधनात्मक संदेश देणारे सेल्फी पाईंट त्याचप्रमाणे प्रभागांमध्ये मतदाना विषयी जनजागृती ध्वनीफित व्हॅनद्वारे केली जाणार आहे.

मतदारांची संख्या वाढविण्यासाठी ऐरोली क्षेत्रात सहा सोसायटीत मतदान केंद्र उभारण्यात येणार असून फाम सोसायटी, बालाजी सोसायटी यांनी परवानगी दिली आहे. त्याठिकाणी देखील आवश्यक सुविधा तत्पर ठेवणार जाणार आहेत. मतदारांना तक्रार करण्यासाठी ऑनलाईन तक्रार निवारण केंद्र, सुविधा ॲप, सीविजील ॲप, १९५० टोल फ्री हेल्पलाईन सुविधा असणार आहे, अशी माहिती भिकाणे यांनी दिली. नागरिकांनी मतदानाचा आपला अधिकार बजावावा, निर्भयपणे मतदान करावे, असे आवाहनदेखील त्यांनी केले आहे.

# आचारसंहितेचे काटेकोर पालन करा

## नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची घोषणा करण्यात आली असून भारत निवडणूक आयोगाच्या आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीस सुरुवात झालेली आहे.

या अनुषंगाने नवी मुंबई महापालिकेच्या संबंधित अधिकारी यांची विशेष आढावा बैठक घेत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी निवडणूक आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

महाराष्ट्र राज्यात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक होत असून आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने सार्वजनिक ठिकाणी पोस्टर्स, फलक, होर्डींग अथवा कोणत्याही स्वरूपात लावलेल्या अनधिकृत राजकीय जाहिराती काढून टाकण्याच्या कार्यवाहीचा विभागनिहाय आढावा घेतला. दोन्ही परिमंडळे व आठही विभाग कार्यालयांनी अतिक्रमण विभागाच्या सहयोगाने ही कार्यवाही अधिक गतीमानतेने व त्वरित पूर्ण करावी, असे निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले तसेच निवडणूकीच्या अनुषंगाने करावयाच्या विविध बाबींचा सविस्तर आढावा घेतला.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, प्रशासन उपायुक्त शरद पवार, निवडणूक उपआयुक्त भागवत डोईफोडे आणि इतर विभागप्रमुख व विभाग अधिकारी उपस्थित होते.

# उरणमध्ये रानडुकराचा हैदोस

## भातपिकांचे केले नुकसान



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालूका परिसरात यंदा परतीच्या पावसाने भात पिके तयार होण्याच्या अखेरच्या वेळेला दररोज सायंकाळच्या वेळेला बरसायला सुरुवात केल्याने भात पिके संकटात सापडली आहेत. या संकटात सापडलेल्या भात पिकांकडे आता जंगली रानडुकरांची वक्रदृष्टी असल्याने भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ लागले आहे. भातशेती कापणीला आली असताना शेतात रानडुकरांचा हैदोस सुरू झाला असल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास कळपाने पिकांवर हल्ला करणारी रानडुकरे हिरावून नेत असल्याने रानडुकरांचा वनविभागाने बंदोबस्त करावा अशी मागणी उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, कोप्रोली, आवरे, साई, दिघाटी परिसरातील शेतकरी वर्गातून होत आहे. पिकलेल्या शेतीची नासाडी करण्यासाठी येणाऱ्या रानडुकरांना पळवून लावण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रभर शेताची राखण करावी लागत आहे. यंदा सुरुवातीला म्हणजे लावणीसाठी पाऊस उत्तम झाला. यानंतर पिके पोटरीला येण्याच्या वेळेला आणि भात कापणीच्या हंगामात परतीच्या पावसाने, पाऊस बरसण्याचे रंग दाखवायला सुरुवात केल्याने येथील शेतीवर संकट आले आहे. ऐन कापणीच्या मोसमात पाऊस दररोज सायंकाळी हजेरी लावत असल्यामुळे तयार भात पिके घरी आणायची तरी कशी? हा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत असून, शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. पावसाचा हा लहरीपणा कायमच राहिल्याने शेती व्यवसाय पूर्णपणे धोक्यात आला आहे.

दरम्यान, परतीचा पाऊस दररोज जोरदार हजेरी लावत असल्यामुळे, शेतात जे काही पिकले आहे, त्या पिकांचेही नुकसान होऊ लागले आहे. बरीचशी भात पिके पाण्याखाली येऊन शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परतीच्या पावसापासून शेती वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. चिरनेर परिसरात काही भागातील भात शेतीवर रोगाची छाया पसरल्याने दाणे न भरताच भात पोचट राहिले आहे. त्यात पिकलेल्या शेतीची रानडुकरे नासाडी करू लागल्याने शेतकरी हवालदील झाला आहे.

परिणामी उरण तालुक्यात रानडुकरांपासून भात पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना रात्री पहारा देण्याची वेळ ओढवली आहे.

> **भात पिकांचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या प्रतिकारात रांडुक्कर मारल्यास शेतकऱ्याविरुद्ध शिकारीचा गुन्हा दाखल होत असल्याने कोणीही असा प्रतिकार अथवा बंदोबस्त करण्याच्या मनस्थिती दिसून येत नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या भातशेतीची नासधूस होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे.**
>
> **–कल्पेश म्हात्रे, शेतकरी, चिरनेर**

# परतीच्या पावसामुळे उरणमधील शेतीला फटका

## पंचनामे करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**उरण : रामप्रहर वृत्त**

गेल्या आठवडा भर सायंकाळी सुरू असलेल्या परतीच्या पावसामुळे पिकलेली भात पिके जमिनीवर आणि पावसात कोसळून कुजू लागल्याने उरणमधील शेतकऱ्यांच्यता हाता तोंडाशी आलेल्या पिकांचे नुकसान होत आहे. या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करण्याची मागणी चिरनेर येथील शेतकऱ्यांनी तालुका कृषी विभागाकडे केली आहे.



**बळीराजा संकटात**

**उरण तालुक्यात साधारण दोन हजार ५०० हेक्टरपेक्षा अधिक भात क्षेत्र आहे. यातील बहुतांशी शेती ही खाडी किनाऱ्यावर आहेत. त्यातच यातील शेतीचा वापर हा उद्योग आणि रस्ते तसेच इतर विकास कामासाठी केला जात असल्याने पिकत्या शेतीचे क्षेत्र कमी झाले आहे, मात्र जेथे शेती होत आहे, तेथे पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकरी संकटात आला आहे.**

उरणमध्ये परतीचा पाऊस हा विजेच्या कडकडाटसह सुरू झाला आहे. त्यामुळे याचा नागरिकांना फटका बसत आहे, मात्र या पावसाने शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. यावर्षी ऑगस्ट महिन्यात सलग पंधरा दिवस पावसाचा खंड पडला होता. त्यामुळे उरणमधील शेकडो हेक्टर जमिनीवरील भातपिके संकटात आली होती, मात्र त्यानंतर जोरदार पावसाने हजेरी लावली.

या पावसामुळे भात शेतीत पाणी वाढल्याने भात पिकांना संजीवनी मिळाली होती. त्यामुळे उरण तालुक्यातील नागाव, केगाव, चाणजे व खोपटे, कोप्रोली, चिरनेर, विंधणे, रानसई, वशेणी, पूनाडे, आवरे पाले, पिरकोन, वेश्वी, गोवठणे, बोरखार आदी गावात भात शेतीचे पीक घेणारे शेतकरी आनंदले होते.

उरण तालुक्यात साधारण दोन हजार ५०० हेक्टर पेक्षा अधिक भात क्षेत्र आहे. यातील बहुतांशी शेती ही खाडी किनाऱ्यावर आहेत. त्यातच यातील शेतीचा वापर हा उद्योग आणि रस्ते तसेच इतर विकास कामासाठी केला जात असल्याने पिकत्या शेतीचे क्षेत्र कमी झाले आहे, मात्र जेथे शेती होत आहे, तेथे पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकरी संकटात आला आहे. सध्या परतीच्या पावसाने कहर केला आहे. दररोज सायंकाळी वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस सुरू आहे.

या पावसामुळे भात पीके आडवी पडून पाण्याखाली येऊ लागली आहेत. परिणामी ती कुजून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे ४० टक्के नुकसान झाले असून यात भर पडण्याची शक्यता आहे. या नुकसानीचे कृषी विभागाने लवकरात लवकर पंचनामे सुरू करण्याची मागणी केल्याची माहिती चिरनेर येथील शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली आहे.

# प्रभाग ४मधील प्रमुख ठिकाणी पनवेल मनपा बसविणार गतिरोधक

## माजी नगरसेविका नेत्रा पाटील यांचा पाठपुरावा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांच्याकडे प्रभागातील रहिवाशांनी केलेल्या मागणीनुसार नेत्रा पाटील यांनी खारघर वाहतूक पोलीस शाखेकडे पाठपुरावा करून त्यांच्या अहवालानुसार लवकरच पनवेल महापालिकेच्या वतीने गतिरोधक बसविण्यात येणार आहेत. याबाबतचे पत्र पालिकेकडून शहर अभियंत्यांच्या नावे नेत्रा पाटील यांना पाठविण्यात आले आहे.

खारघर वाहतूक शाखेच्या हद्दतील खालील नमुद ठिकाणी गतिरोध लावण्याकरिता अर्जदार नेत्रा किरण पाटील, मा. नगरसेविका (प्रभाग क.४/व) पनवेल महापालिका यांनी पत्र कार्यालयात दिले आहे. या अर्जाचे अनुषंगाने महिला पोलीस उपनिरीक्षक स्नेहा पाटील यांनी या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता ठिकाणी गतिरोधक बसविण्याची आवश्यकता असल्याचे नमुद केले आहे.

सेक्टर १९ पुजा रेसिडेन्सी प्लॉट नं.२७ या सोसायटीकडुन बाहेर जाणारा रस्ता तसेच सेक्टर १९ कडुन वास्तुविहार सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर जैन मंदिर चौक, प्लॉट नं.१५ मारुती टावर या ठिकाणी व पुढे प्लॉट नं.१७,१८ रेखीसाई डेफोडील सोसायटी, मुरबी गावाच्या लागुन असलेल्या प्रवेश कमानीजवळ जॉय रायजिग सोसायटी, फ्लाट नं.१०५ समोर, ग्रीन हेरिटेल सर्कलकडुन सेक्टर २३ डेल्टा सोसायटीकडे जाण्याच्या रस्ता खारघर, सेक्टर २०, साई सागर सोसासयटी, चौधरी स्विट्स समोरील रोड, खारघर या नमुद ठिकाण गतिरोधक बसविण्यात येणार आहेत.

# आगरी शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शाळेचे किक बॉक्सिंग स्पर्धेत सुयश



**कळंबोली : बातमीदार**

जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धा २०२४–२५ खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात १४ ते १९ या वयोगटातील मुलांसाठी आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात आगरी शिक्षण संस्थेच्या खांदा कॉलनी येथील माध्यमिक विद्यालयाला सुयश प्राप्त झाले.

या स्पर्धेत ओमकार पवार याला गोल्ड मेडल तसेच सानिया शेख व आदित्य गौतम यांना सिल्वर मेडल तसेच अनिष्का वाशीकर, आयुष सिंग, ओम पवार, गिरीश आलदर, ऋतुजा काळे, साक्षी बोने, साक्षी चंदनशिवे यांना ब्राँझ मेडल मिळाले आहेत. ओंकार पवार व कुमारी अनिष्का वाशिकार यांना स्पर्धेतील यशामुळे पुढील विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र झालेत.

या विद्यार्थ्यांना प्रशिक्षक योगेश बैकर व स्मिता पाटील यांनी मार्गदर्शन केले. विजयी सर्व उमेदवारांचे अभिनंदन शाळेचे प्राचार्य पंकज भगत यांनी केले.







**पनवेल : उत्तर रायगड जिल्हा सोशल मीडिया सेलचे जिल्हा सहसंयोजक चेतन कांबळे यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी विस्तारक सागर मोरे, प्रभारी प्रसाद मांडलेकर, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, ओबीसी मोर्चा सोशल मीडिया सेल जिल्हा प्रभारी तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते, विभागीय अध्यक्ष अनिश ढवळे, अनुसूचित जाती मोर्चा तालुका अध्यक्ष अविनाश गायकवाड, कामोठे शहर अध्यक्ष मयूर मोहिते आदी उपस्थित होते.**

# नारीशक्ती चषकात महिला क्रिकेटचा जल्लोष



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मानवी हक्क संरक्षण फेडरेशन आणि केंद्रीय लोकशाही पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या एकदिवसीय बॉक्स क्रिकेट स्पर्धेत सर्व वयोगटातील महिलांनी उत्साहात सहभाग घेतला. १८ ते ५८ या वयोगटातील महिलांनी क्रिकेटचा अनुभव घेतला आणि खेळाच्या या उत्साही मैदानावर आपली उपस्थिती नोंदवली.

स्पर्धेची उद्घाटन सोहळा पोलीस पत्नी रत्नप्रभा गोमासे यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील क्रिकेट सामना तरुणाईत नवीन ऊर्जा भरून गेला. अनेक सामने अत्यंत प्रतिस्पर्धी पद्धतीने खेळले गेले. या स्पर्धेत काही महिलांनी पहिल्यांदाच क्रिकेट खेळण्याचा अनुभव घेतला.

स्पर्धेत दहा संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील विजेतापद मैत्री ग्रुप पनवेल यांनी तर उपविजेतापद हरमनी स्पोर्ट्स क्लब यांनी मिळवले. विजेत्या आणि उपविजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके आणि चषक देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू, फलंदाज, गोलंदाज आणि मालिकावीर अशा विविध श्रेणींमध्ये पारितोषिके देण्यात आली.

या कार्यक्रमास पनवेल एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन इक्बाल काझी, उद्योजक अस्लम मुंशी, माजी नगरसेवक मुकिद काझी, उद्योगपती नविद पटेल, आशा की किरण फाउंडेशनचे चेअरमन बशीर कुरेशी, नुरजहा कुरेशी, उद्योजक मुद्दासिर पटेल, रॉयल गार्डनचे मुझमिल ठाकूर, उद्योजक जितेंद्र खैरे, तमिम मुल्ला, हमीद शेख, तमिम सर, खलील तांबोळी, शहबाझ पटेल, राजेश्री कदम आणि क्रिकेट प्रेमी उपस्थित होते.

हा कार्यक्रम लाईव्ह ठेवण्यात आला होता. नारी शक्ती चषक २०२४ हा महिलांना क्रिकेटच्या माध्यमातून एकत्र येण्याची आणि आपली क्षमता प्रदर्शित करण्याची एक उत्तम संधी ठरला. हे कार्यक्रम महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक एकमहत्त्वपूर्ण पाऊल आहे. अशा प्रकारच्या स्पर्धा महिलांमध्ये आत्मविश्वास वाढवण्यास आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत करतात.

या स्पर्धेचे आयोजन मानवी हक्क संरक्षण फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूरज नागे, शाहरुख खान, इरफान तांबोळी, नाशिद देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

# वडगावमधील पाणी समस्या मिटली

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील वडगाव ग्रुप ग्रामपंचायत अधिकारी सुहास वारे यांनी कार्यवाही सुरू करून परिश्रम घेत वडगाव गावातील जीर्ण जुनी पाईलाइन काढून त्याजागी नवीन पाईपलाईन टाकल्याने वडगावात घराघरात पाणी पोहचले आहे.



हद्दीत कित्येक वर्ष वडगाव ग्रामस्थांना पाण्याचा प्रश्न सतावत होता. वडगाव गावातील पाणीपुरवण करणारी पाईपलाईन जुनी झाल्याने ग्रामस्थांना सुरळित पाणीपुरवठा होत नसल्याने महिलांना इतरत्र पाण्यासाठी भटकावे लागत होते. ही समस्या नागरिकांनी उपस्थित करताच नवीन पाईपलाईन टाकण्यात आली.

घराघरात पाणी आल्याने ग्रामस्थांत आनंदाचे वातावरण असून त्यांनी वडगाव ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी सुहास वारे, माजी सरपंच गौरी गडगे व शासकीय अधिकाऱ्यांना धन्यवाद दिले आहेत. पहिल्यांदा वडगाव गावात नळाला मोठ्या प्रेशनने पाणी आल्याने महिला वर्गांत समाधान दिसून येत आहे.

> **आम्हा वडगाव ग्रामस्थांची पाण्याची समस्या सुटल्याने आम्ही वडगाव ग्रामपंचायतीचे आभार मानतो.**
>
> **–ग्रामस्थ महिलावर्ग**

# भिंगार येथे जागतिक अन्न दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद शाळा भिंगारच्या वतीने लोकांमध्ये पौष्टिक अन्न आणि चांगल्या आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी जागतिक अन्न दिन साजरा केला.



सकस आहार आणि आहाराच्या सवयींबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्हा परिषद शाळेने आयोजन केले. हेल्दी फूडदेखील चविष्ट असू शकते हे याचे महत्त्व पटवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. त्यांनी निरोगी हृदय, निरोगी शरीर हा संदेश दिला होता.

विद्यार्थ्यांना आरोग्यदायी जीवनशैली आणि पौष्टिक आहार तत्त्याची माहिती देण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका सुशीला लवटे यांनी विविध आंतरराष्ट्रीय पाककृती, मूलभूत टेबल शिष्टाचार आणि नीतिमत्तेबद्दल अतिरिक्त ज्ञान असलेल्या अशा उपक्रमांनी जागतिक अन्न दिन अधिक समृद्ध आणि अद्‌भूत अनुभवावर भर दिला.

या कार्यक्रमास भिंगारचे ग्रामपंचायत अधिकारी अनिल चौधरी, पेणचे केंद्र प्रमुख चक्रपाणी भगत यांनी भेट दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न केले.



**पनवेल : महापालिकेच्या मुख्यालयात गुरुवारी महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी उपायुक्त कैलास गावडे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, सहायक आयुक्त स्वरूप गावडे, लेखाधिकारी संग्राम व्हारेकाटे, मनपा युनियन सदस्य सचिन चींडीलिया, शरद कांबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, महर्षी वाल्मिकी समाज मंडळाचे सदस्य, जय महाकाली मित्र मंडळाचे सदस्य, आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**


## संपादकीय

# बॉम्बच्या धमक्यांचा अतिरेक

गेल्या काही दिवसांत देशातील विमानांमध्ये बॉम्ब ठेवल्याच्या धमक्यांच्या असंख्य घटना समोर आल्या आहेत. या अशा धमक्या गेले दोन–तीन दिवस तर रोजच कुठल्या न कुठल्या भारतीय विमानाला मिळत असल्याने हे काय सुरू आहे, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो आहे, तर या धमकीसत्रामुळे सुरक्षा यंत्रणांवरील ताणही निश्चितच पराकोटीचा वाढला आहे. यासंदर्भात कठोर कारवाईची गरज असून सरकारने त्यादिशेने हालचाली सुरू केल्या आहेत.

**गेले काही महिने अधुनमधून देशातील विमानात बॉम्ब ठेवल्याच्या धमकीच्या घटना घडतच होत्या, परंतु गेल्या तीन ते चार दिवसांत बॉम्बने विमान उडवण्याची धमकी देण्यात आल्याच्या जवळपास २० घटना घडल्या आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने या प्रकारांची अत्यंत गंभीर दखल घेऊन कारवाई अधिक कठोर करण्याच्या दिशेने पावले उचलायला सुरूवात केली आहे. या घटनांची ताजी उदाहरणे द्यायची झाल्यास बुधवारी अकासा या विमान कंपनीचे बंगळुरुला जाणारे विमान बॉम्बच्या धमकीमुळे पुन्हा दिल्लीला परतले. त्या आधीच्या तीन दिवसांत अशा १९ धमक्या मिळाल्या होत्या. मंगळवारी दिवसभरात सुमारे नऊ विमानांना बॉम्बची धमकी मिळाली. एअर इंडिया एक्सप्रेसच्या एका विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाल्याने या विमानाचे उत्तर प्रदेशातील विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. त्याच दिवशी दिल्लीहून शिकागोला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानासंदर्भातही तशीच धमकी मिळाली. हे विमान तर आपत्कालीन लँडिंगसाठी कॅनडाला वळवावे लागले. कॅनडातील विमानतळावर अडकलेल्या प्रवाशांना नंतर कॅनडाच्या हवाई दलाच्या विमानाने शिकागोला नेण्यात आले. या साऱ्या घटनाक्रमात संबंधित प्रवाशांना किती मानसिक त्रास झाला असेल याची कल्पना करता येणार नाही. प्रवाशांसोबत विमानातील कर्मचाऱ्यांनाही या अशा धमक्यांमुळे अत्यंत तणावपूर्ण परिस्थितीत काम करावे लागते. या सर्व विमानांमध्ये प्रवाशांची संख्या मोठी होती व त्यात लहान मुलांचाही समावेश होता. यापैकी काही धमक्यांच्या संदर्भात एका अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची रवानगी सुधारगृहात करण्यात आली आहे. यापैकी काही विमानांच्या संदर्भात उड्डाणापूर्वीच धमकी प्राप्त झाल्याने त्यांना विमानतळावरच थांबवून त्यांची कसून तपासणी करण्यात आली तर काही उड्डाणांचे आपत्कालीन लँडिग करावे लागले. यापैकी काही घटनांमध्ये एक्स या समाजमाध्यमाचा (जे पूर्वी ट्विटर या नावाने ओळखले जात असे) वापर करण्यात आला. संबंधित ट्वीटची माहिती मिळताच ती तातडीने विमान प्राधिकरणाला देण्यात आली. हे सगळेच अर्थातच संबंधित सर्व यंत्रणांना प्रचंड तापदायक ठरले आहे. त्यामुळेच सुरक्षा यंत्रणांनी 'एक्स'कडून संबंधित वापरकर्त्यांविषयी माहिती मिळवली असता त्यापैकी दोन संदेश लंडन व जर्मनी येथून पोस्ट करण्यात आल्याचे आढळले आहे. या साऱ्याची उच्च स्तरीय चौकशी सुरू असून एक्सकडून वापरकर्त्यांविषयी अधिक माहिती मिळवली जाते आहे. सध्या या प्रकारासंदर्भात नेमक्या कायदेशीर तरतुदी नसल्यामुळे अस्तित्वात असलेल्या गुन्हेगारीविषयक कायद्यांच्या आधारेच अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्ह्याची नोंद केली जाते आहे. परंतु या घटनांचे प्रचंड वाढलेले प्रमाण लक्षात घेऊन सरकार अधिक कठोर नियमांची तरतूद तातडीने करणार आहे. सर्व संबंधित खात्यांशी त्यासंदर्भात विचारविनिमय सुरू आहे. तातडीचे पहिले पाऊल म्हणून अशा घटनांत सहभाग असणाऱ्या व्यक्तीस विमानातून प्रवास करण्यावर बंदी घातली जाणार आहे. यापुढे कुणीही अशातऱ्हेचा खोडसाळपणा करण्यास धजावणार नाही. अशातऱ्हेची कारवाई करण्याची निश्चितच गरज आहे.**

# सागरी मार्गामुळे कोकणच्या विकासाला चालना



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

कोकण विकासासाठी अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या रेवस–रेड्डी सागरी मार्गावरील महत्त्वाच्या सात पुलांचे भूमिपूजन नुकतेच करण्यात आले. यात रायगड जिल्ह्यातील तीन, रत्नागिरी जिल्ह्यातील तीन, तर सिंधुदूर्ग जिल्ह्यातील एका खाडी पुलाचा समावेश आहे. हे पूल बांधून झाल्यावर सागरी महामार्ग पूर्ण होईल. त्यामुळे कोकणच्या विकासाला चालना मिळेल.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅ. ए.आर. अंतुले यांनी १९८० काळात सागरी महामार्गाची संकल्पना मांडली होती. मुंबई–गोवा महामार्गाला पर्यायी ठरू शकेल आणि कोकणाच्या पर्यटनाला चालना मिळेल या हेतूने सागरी महामार्गाची संकल्पना मांडली गेली होती. रेवस ते रेड्डी यादरम्यान हा सागरी महामार्ग तयार केला जाणार होता, पण बॅ. अंतुलेंना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. यानंतर या सागरी महामार्गाचे काम रखडले. त्यानंतर काही वर्षांनी पुन्हा या महामार्गाचे काम सुरू करण्यात आले. या महामार्गावरील खाडी पुलांची कामे होऊ शकली नाहीत. हा सागरी मार्ग अस्तित्वात येऊ शकला नव्हता. रेवस ते रेडी (सिंधुदुर्ग) सागरी महामार्गाची एकूण लांबी ४९८ किमी आहे. या मार्गात खाडी आणि सागरातून सात पूल उभारले जाणार आहे. त्याची एकूण लांबी २६.७० किमी आहे. या पुलासाठी सात हजार ८५१ रुपये प्रशासकीय मान्यता शासनाने दिली आहे. पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा महामार्ग, कोकण किनारपट्टीवरील सर्व सागरी किनारे यांना गतिमान महामार्गाने जोडणारा प्रकल्प आहे. रायगड जिल्ह्यातील रेवस–करंजा, रेवदंडा–साळाव, दिघी–आगरदांडा, रत्नागिरी जिल्ह्यातील वेश्वी–बागमांडला, केळशी, जयगड, तर सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर येथील पुलाचे काम सुरू करण्यात येणार आहे.

रेवस–रेड्डी सागरी महामार्गावर रायगड जिल्हा हद्दीत खाड्यांवर चार पुलांची उभारणी होणार आहे. या पुलांमुळे तालुका आणि जिल्हे एकमेकाला जोडले जाणार आहेत. जिल्ह्यातील हे महत्त्वाचे पूल तीन वर्षात उभारले जाणार आहेत. पुलांच्या या उभारणीमुळे एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात, जिल्ह्यात जाणे सोपे होणार असून वेळेची बचत होणार आहे. या पुलामुळे पर्यटनालाही चालना मिळणार आहे.

रेवस–करंजा हा धरमतर खाडीवर पूल तीन वर्षात बांधला जाणार आहे. तीन हजार ५७ कोटी खर्च होणार आहे. त्यामुळे अलिबाग आणि उरण तालुका या पुलामुळे जोडले जाणार आहे. रेवदंडा–साळाव हा कुंडलिका नदीवर ३.८२ किमीचा एक हजार ७३६ कोटी खर्च करून दुसरा पूल तीन वर्षात उभारला जाणार आहे. यामुळे अलिबाग व मुरूड हे दोन तालुके जोडले जाणार आहेत. दिघी आगरदांडा भागातील आगरदांडा खाडीवरील ४.३१ किमी पूल बांधला जाणार असून एक हजार ३१५ कोटी खर्च अपेक्षित आहे. या पुलामुळे मुरूड आणि श्रीवर्धन तालुके जोडले जाणार आहेत. बागमांडला वेश्वी भागातील बाणकोट खाडीवर पूल बांधला जाणार असून ४०८ कोटी खर्च होणार आहे. या पुलामुळे रायगड आणि रत्नागिरी जिल्हा जोडला जाणार आहे.

या पुलामुळे रायगड जिल्ह्यातील तालुके एकमेकांना जोडले जाणार आहेत. त्याचबरोबर रत्नागिरी जिल्हादेखील जोडला जाणार आहे. हे सर्व पूल उभारल्यानंतर रेवस ते रेड्डी हा सागरी महामार्ग तयार होईल. या महामार्गामुळे मुंबईतून कोकणचा प्रवास जलद होईल. कोकणचा विकास होईल. कोकणातील पर्यटनालाही चालना मिळणार आहे.

**रेवस–करंजा विकासाचा साकव**

सध्या अलिबागहून उरणला जायचे असेल तर अलिबाग वडखळ–खारपाडा असा प्रवास करावा लागतो. यात पैसा व वेळेचा अपव्यय होतो. हे टाळण्यासाठी प्रवासी रेवस–करंजा असा तरीतून प्रवास करतात. पुढे जायचे असल्यास दुसऱ्या वाहनाने प्रवास करावा लागतो. तरीतून मोटरसायकल नेता येते, परंतु मोठी वाहने नेता येत नाहीत. त्यामुळे मोटारीने जायचे असल्यास खारपाडामार्गेच जावे लागते. रेवस–करंजा पूल झाल्यास हा वळसा घालाव लागणार नाही. त्याचप्रमाणे वाशी ते रेवस हे अंतर ३९ किमी कमी होईल. वाशी ते मांडवा हे अंतर ३९ किमी, उरण–अलिबाग अंतर ४४ किमीने, जेएनपीटी–अलिबाग अंतर ३५ किमीने, तर जेएनपीटी–मुरूड अंतर ३६ किमीने कमी होईल. अलिबाग–मुंबई प्रवास करण्यासाठी मुंबई–गोवा महामार्गाने प्रवास करावा लागतो. हे अंतरदेखील या पुलामुळे कमी होणार आहे. हा पूल पूर्ण झाल्यावर अलिबाग थेट नवी मुंबई, मुंबईशी जोडला जाणार आहे. हा पूल झाल्यानंतर अटल सेतूमार्गे थेट मुंबईला जाता येईल. या पुलामुळे अलिबाग थेट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह जेएनपीटीला जोडले जाणार आहे. रेवस–करंजा हा पूल म्हणजे अलिबाग आणि उरण परिसरासाठी विकासाचा साकव ठरणार आहे.

## बदलते तंत्रज्ञान



# बीएसएनएलची डायरेक्ट टू डिव्हाइस सॅटेलाईट चाचणी

तुम्ही सिमकार्डशिवाय डेटा, कॉलिंगची सुविधा मिळवू शकता. त्यासाठी ही बातमी सविस्तर वाचा. 'Viasat'ने BSNLच्या सहकार्याने डायरेक्ट टू डिव्हाइस सॅटेलाईट कनेक्टिव्हिटीची यशस्वी चाचणी घेतली. यामुळे व्यावसायिक अँड्रॉइड स्मार्टफोनवर एसओएस मेसेजिंग सुरू झाले आहे. या तंत्रज्ञानामुळे मोबाइल फोन, स्मार्टवॉच आणि इतर उपकरणे कुठेही कनेक्ट होऊ शकतील. या विषयी विस्ताराने जाणून घ्या.






सॅटेलाईट कम्युनिकेशन कंपनी Viasatने डायरेक्ट टू डिव्हाइस सॅटेलाईट कनेक्टिव्हिटीचे प्रात्यक्षिक दाखवले आहे. विशेष म्हणजे ही चाचणी भारतासाठी अभिमानाची बाब बनली आहे. BSNLच्या सहकार्याने Viasatने व्यावसायिक अँड्रॉइड स्मार्टफोनवर सॅटेलाइट पॉवर्ड आणि SOS मेसेजिंगची चाचणी केली आहे.

इंडिया मोबाइल कॉंग्रेस २०२४ दरम्यान ही चाचणी घेण्यात आली. दोन्ही कंपन्यांनी आपल्या संयुक्त निवेदनात याला दुजोरा दिला आहे. Viasatने म्हटले आहे की, ते आपल्या भागीदारांसह काम करीत आहेत, BSNL या यादीत आहे. प्रत्यक्षात ही संपूर्ण चाचणी सॅटेलाईट सर्व्हिस ग्राहक आणि आयओटी उपकरणांसाठी करण्यात आली आहे.

Viasatने केलेली ही चाचणी दुतर्फा आणि SOS संदेश देणारी होती. हे व्यावसायिक अँड्रॉइड स्मार्टफोनवर केले गेले. एनटीएन कनेक्टिव्हिटीसाठी हे करण्यात आले होते. चाचणीदरम्यान ३६ हजार किलोमीटर अंतरावरून त्याचा प्रसार करण्यात आला. Viasat सॅटेलाईट नेटवर्कचा वापर करून सेल फोन कनेक्टिव्हिटी सुरू केली जाते आणि त्याच्याशी सहज कनेक्ट केले जाऊ शकते, असे या निष्कर्षातून दिसून आले आहे. विशेष म्हणजे याचा वापर व्यवसायासाठीही होऊ शकतो.

डायरेक्ट–टू–डिव्हाइस कनेक्टिव्हिटी हे एक नवीन तंत्रज्ञान आहे जे मोबाइल फोन, स्मार्टवॉच किंवा कार– औद्योगिक मशिनरी आणि ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्सला उपग्रह नेटवर्कशी कनेक्ट होण्यास मदत करते. हे सर्व डिव्हाइसेस कनेक्ट करण्यास मदत करते, विशेष म्हणजे आपण ते कोठूनही कनेक्ट करू शकता. दरम्यान, डायरेक्ट–टू–डिव्हाइस कनेक्टिव्हिटी या नव्या तंत्रज्ञानाचा विविध क्षेत्रात फायदा होऊ शकतो. हे तंत्रज्ञान मोबाइल फोन, स्मार्टवॉच किंवा औद्योगिक मशिनरी व ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्सला उपग्रह नेटवर्कशी कनेक्ट होण्यास मदत करते.

# कायदेपंडित, लेखक चिंतामणराव वैद्य



**निमित्त**

भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य यांचा जन्म १८ ऑक्टोबर, इ.स. १८६१ मध्ये झाला. हे संस्कृत भाषेतील विद्वान होते. त्यांनी अनेक माहितीप्रचुर पुस्तके लिहिली. संस्कृत भाषेच्या व्यासंगामुळे त्यांनी रामायण–महाभारतासारख्या पौराणिक इतिहासाच्या अनेक अपरिचित भागांवर प्रकाश टाकला.

चिंतामणराव वैद्यांचे वडील विनायकराव हे कल्याणला वकिली करीत. चिंतामणरावांचे शिक्षण कल्याण तसेच मुंबईच्या एल्फिन्स्टन स्कूल व एल्फिन्स्टन कॉलेजात झाले. इ.स. १८८२त एम.ए. आणि १८८४मध्ये एल्एल.बी. झाल्यानंतर त्यांनी काही काळ कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ येथे मुनसफ म्हणून व नंतर ठाण्याच्या कोर्टात वकील म्हणून काम केले. त्यानंतर ते उज्जैन येथे न्यायाधीश पदावर रुजू झाले. पुढे १८९५मध्ये ग्वाल्हेर संस्थानच्या सरन्यायाधीशपदी त्यांची नियुक्ती झाली. सेवानिवृत्तीनंतर ते १९०५ सालापासून लोकमान्य टिळकांचे सहकारी म्हणून काम करू लागले. राष्ट्रीय शिक्षणाचे काम त्यांनी आस्थेने व निष्ठेने केले. कोलकाता, सुरत आदी कॉंग्रेस अधिवेशनांना ते टिळकांबरोबर गेले. टिळकांच्या पश्चात वैद्यांनी महात्मा गांधीजींचा मार्ग अनुसरला. वेगवेगळ्या समित्यांवर काम करणे, अहवाल लिहिणे ही कामे त्यांनी गांधींच्या मार्गदर्शनाखाली केली.

वैद्य हे पुणे येथे टिळक महाविद्यालयात व्याख्याते होते. चि.वि. वैद्यांनी १८८९ ते १९३४ या काळात सुमारे ५०,००० पृष्ठे इतके लेखन इंग्रजी–मराठीत केले. त्यांचे स्फुटलेखन केसरी, विविधज्ञानविस्तार, इंदुप्रकाश, नेटिव्ह ओपिनियन आदी नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले. यांपैकी फारच थोडे लेखन ग्रंथरूपात आले. त्यांचे एकूण २९ ग्रंथ प्रकाशित झाले, पैकी नऊ ग्रंथ इंग्रजीत आणि २० मराठीत होते.

चिं.वि. वैद्यांच्या 'महाभारत ए क्रिटिसिझम या इंग्रजी ग्रंथावर लोकमान्य टिळकांनी केसरीतून सलग आठ अग्रलेख लिहून परीक्षण केले व ग्रंथांची मौलिकता दाखविली. त्यानंतर टिळकांनी आणखी एक अग्रलेख लिहून रिडल ऑफ रामायण या ग्रंथाचे परीक्षण केले. रामायण व महाभारत ही कल्पित काव्ये नसून ते इतिहासाचे ग्रंथ आहेत, या आपल्या विश्वासाला वैद्यांकडून व्यासंगपूर्ण समप्रमाण पुष्टी मिळाल्याबद्दल लोकमान्यांनी आपल्या अग्रलेखात (६ जुलै१९०६) समाधान व्यक्त केले आहे. वैद्यांनी महाभारताच्या संदर्भात एपिक इंडिया व श्रीकृष्ण चरित्र हे ग्रंथ लिहिले.

मानवधर्मसार व हिंदू धर्माची तत्त्वे या दोन पुस्तिकांतून वैद्यांचे हिंदुधर्मविषयक विचार व्यक्त झाले आहेत. त्यांच्या या पुस्तकांतून ईश्वर, सैतान, स्वर्ग आणि नरक, ग्रंथप्रामाण्य, चमत्कार, मूर्तिपूजा, आश्रमव्यवस्था इ. विषयांसंबंधी चिकित्सा केलेली आहे.

वैद्यांनी प्राचीन व मध्ययुगीन भारतीय इतिहासावर विविधांगी व प्रचंड संशोधन करून ग्रंथलेखन केले. त्यांपैकी 'हिस्टरी ऑफ मिडिव्हल हिंदू इंडिया' या ग्रंथाचे तीन खंड त्यांनी प्रथम इंग्रजीत लिहिले. आणि त्यानंतर त्याचा तीन–खंडी मराठी अनुवाद 'मध्ययुगीन भारत' या नावाने प्रसिद्ध केला. याशिवाय 'गझनीच्या महमूदाच्या स्वाऱ्या' आणि 'शिवाजी द फाउंडर ऑफ मराठा स्वराज' हे त्यांचे दोन अन्य इतिहासविषक ग्रंथ होत.

**(साभार : विकीपीडिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**माथेरान : सध्या परतीचा पाऊस सर्वत्र धुमाकूळ घालत असताना वातावरण एकदम बदलून जाते. माथेरानच्या पॉईंटवर उभे राहून सह्याद्रीच्या डोंगररांगेत सूर्यास्ताच्या वेळी आकाशात उमटलेल्या छटा येथे लक्ष वेधून घेत आहेत.** (छाया : संतोष खाडे)

## आरोग्य प्रहर

# भेसळयुक्त कुंकू कसे ओळखावे? खास टिप्स

हिंदू धर्मामध्ये प्रत्येक शुभ कार्यात कुंकवाचा टिळा लावला जातो. कुंकवाला सौभाग्याचे प्रतीकही म्हटले जाते. पण, तुम्हाला माहीत आहे का की, कुंकू दूषित घटकांनीही बनवले जाऊ शकते? परंतु, यामुळे तुम्हाला घाबरण्याची आवश्यकता नाही. कारण–पनीर, लोणी आणि लसूण यांसारख्या पदार्थांमध्ये होणारी भेसळ ओळखल्यानंतर आता आम्ही तुम्हाला भेसळयुक्त कुंकू कसे ओळखायचे ते सांगणार आहोत.



डॉ. करुणा मल्होत्रा, सौंदर्य चिकित्सक, सौंदर्यशास्त्रज्ञ व कॉस्मेटिक स्किन अॅण्ड होमिओ क्लिनिक राजौरी गार्डन, नवी दिल्ली येथील त्वचातज्ज्ञ म्हणाल्या, भेसळयुक्त कुंकू ओळखणे अत्यंत आवश्यक आहे. कारण– काही भेसळयुक्त कुंकू त्वचेवर जळजळ किंवा इतर आरोग्य समस्या निर्माण करू शकतात.

**चमक, रंग तपासा** : भेसळविरहित कुंकवाचा रंग नैसर्गिक चमकदार लाल किंवा नारिंगी–लाल असतो. नकली किंवा भेसळयुक्त कुंकवामध्ये असामान्य चमकदार चमक किंवा अनैसर्गिक रंग असू शकतो, जो हानिकारक रंग किंवा रसायनांची उपस्थिती दर्शवतो.

**रासायनिक सुवास** : अस्सल कुंकवाला साधारणपणे तीव्र गंध नसतो. जर त्याला रसायने किंवा धातू (जसे की पारा) सारखा वास येत असेल, तर ते भेसळयुक्त असू शकते, असे डॉ. मल्होत्रा म्हणाल्या.

**जल परीक्षण** : त्यासाठी कुंकू पाण्यात मिसळा. डॉ. मल्होत्रा यांच्या मते, शुद्ध कुंकू सहज पाण्यात विरघळेल; तर भेसळयुक्त कुंकू जोडलेल्या रसायनांमुळे रंग वेगळे करू शकतो.

**पारा आणि शिसे तपासा** : भेसळयुक्त कुंकवामध्ये लेड ऑक्साईड किंवा पारा सल्फाइड असते, जे आरोग्यासाठी धोकादायक असते. त्यामुळे लोकल मार्केटमधून कुंकू खरेदी करणे टाळा. योग्य प्रमाणीकरणासह विश्वासार्ह ब्रॅण्ड्सची निवड करा, असा सल्ला डॉ. मल्होत्रा यांनी दिला.

**टीप : सुरक्षित राहण्यासाठी नेहमी नैसर्गिक किंवा हर्बल, असे स्पष्टपणे लेबल लावलेले आणि हानिकारक रसायने आणि जड धातूपासून मुक्त असलेल्या कुंकवाची निवड करा.**

# रायगडात अपघातांचे प्रमाण वाढले

## माणगावजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव-पुणे रस्त्यावर खर्डी गावच्या हद्दीत साबळे क्रेशर जवळ माणगाव या ठिकाणी भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (दि.१७) सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडला. या अपघाताच्या गुन्ह्याची फिर्याद सहदेव रामचंद्र सोंडकर (वय ६३,



रा.भादाव,ता.माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

अपघाताच्या गुन्ह्याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, अपघाताच्या गुन्ह्याची फिर्याद देणारे सहदेव रामचंद्र सोंडकर यांचा मयत भाऊ मधुकर रामचंद्र सोंडकर (वय -५६, रा.नवेनगर निजामपूर, ता.माणगाव) हे आपल्या ताब्यातील होंडा ॲक्टिवा स्कूटी (एमएच ०६ सीएफ ४०३८) ही गाडी निजामपूर ते माणगाव अशी चालवीत घेऊन जात असताना त्यांची गाडी माणगावजवळील खर्डी गावच्या हद्दीत साबळे क्रेशर जवळील वळणाच्या रस्त्यावर आल्यावर समोरून येणाऱ्या अज्ञात वाहनावरील चालकाने त्यांच्या ताब्यातील वाहन हे अती वेगाने चालवून मयत यांच्या स्कूटीला धडक लागून अपघात घडला.

या अपघातात मयत मधुकर सोंडकर यांच्या मानेच्या डाव्या बाजूला गंभीर दुखापत होऊन त्यामध्ये त्यांचा मृत्यू होऊन अज्ञात वाहनावरील चालक पळून गेला. या अपघाताच्या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शाखाली पोलीस उपनिरीक्षक चव्हाण हे करीत आहेत.

# माणगाव उतेखोलवाडी शाळेत वाचन प्रेरणा व हात धुणे दिन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील १०० टक्के पटनोंदणी व १०० टक्के विध्यार्थी उपस्थिती असणाऱ्या पीएम श्री राजिप शाळा उतेखोलवाडी शाळेत १५ ऑक्टोबर २०२४ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे जयंती व आंतरराष्ट्रीय हात धुणे दिन तसेच वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सार्वजनिक स्वच्छतेसोबत वैयक्तिक स्वच्छता ही आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. यासाठी दिवसातून कितीवेळा हात धुवावे व कसे धुवावे याचे प्रात्यक्षित शिक्षकांकडून विध्यार्थ्यांना दाखविण्यात आले तसेच मोबाईलच्या दुनियेत विविध प्रेरणादाई पुस्तके वाचनापासून विद्यार्थी वंचित राहू नयेत, विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला पालकांकडून शाळेला वाचन प्रेरक पुस्तके आणि ऑक्सिजन पास म्हणून तुळशीची रोपे व फुल, झाडे भेट देण्यात आली. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे जयंती साजरी करताना आंतरराष्ट्रीय हात धुणे दिन आणि वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मॅड ग्रुपकडून उतेखोलवाडी शाळेला व केंद्र प्रमुख शंकर शिंदे यांना पुस्तके भेट देण्यात आली.

या पुस्तकांचा मुलांच्या वाचनासाठी अनमोल उपयोग होऊन वाचन क्षमता मुलांची वाढत आहे तसेच हात धुणे दिन साजरा करत असताना विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले तसेच विद्यार्थी वर्गासमवेत शिक्षकांनी हात कसे धुवावे याचे प्रात्यक्षिक शिक्षक आणि विद्यार्थी मिळून करण्यात आले सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन हात धुण्याचे प्रात्यक्ष केले. स्वच्छता दूत म्हणून काम करत असताना प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक स्वच्छता आणि सामूहिक स्वच्छता याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केले. स्वच्छता दूत म्हणून काम करत असताना प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक स्वच्छता आणि सामूहिक स्वच्छता याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केले अनेक वर्ष आपला शिक्षक वृंद करत आहे.

उपक्रमशील शाळा पीएम श्री शाळा ओथिकुलवाडी माणगाव येथील उपक्रमशील शिक्षक सतत क्रियाशील असतात. आदर्श शिक्षक विनया जाधव मुख्याध्यापक श्रमिका आंबोले ज्येष्ठ शिक्षिका स्नेहल उतेकर तसेच निलेश पाष्टे गुरुजी यांच्या समवेत पूर्ण व्यवस्थापन समिती केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे आणि मॅडम या सर्वांच्या अनमोल योगाने एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस आनंदात साजरा करण्यात आला सतत क्रियाशील आणि उपक्रमशील अशी शाळा आणि व्यवस्थापन यामुळे आजचा शाळेचा पट १०२ आहे.

पीएम श्री शाळेमध्ये सातत्याने विविध योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. ज्यामुळे माणगाव तालुक्यातच नव्हे तर रायगड जिल्ह्यामध्ये गुणवत्तापूर्ण शाळा म्हणून पीएम श्री शाळा म्हणून उतेखोलवाडी शाळेचे नाव प्रसिद्ध आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उतेखोलवडीतील सर्व शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली.





# 'लागता श्री स्वामींचे चरण' पुस्तकाचे प्रकाशन

**कर्जत : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ यांच्या सानिध्यात आल्यानंतर वयाच्या ७५ व्या वर्षी स्वामी भक्त नीलिमा श्रीकृष्ण काळे यांनी लिहिलेले 'लागता श्री स्वामींचे चरण' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

नवी मुंबई नेरूळ येथील रहिवाशी असलेल्या नीलिमा काळे या कर्जतजवळील पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठाच्या नियमित सेवक आहेत. त्या अनेक वर्षे स्वामींची सेवा करीत असून स्वामी सेवेच्या सहवासाचे अनुभव काळे यांनी लागता श्री स्वामींचे चरण हे पुस्तक लिहिले आहे. पुस्तकाचे प्रकाशन कोजागिरी पौर्णिमेला श्री स्वामी समर्थ यांच्या सहवासात झाले. या



पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाची सुरुवात रेडिओ जॉकी अर्चना यांनी सरस्वती वंदनाने केली.

कार्यक्रमाला विजया गोवित्रीकर, कल्पना करंदीकर, केकान, जगदीश दवे, अमोल क्षीरसागर, वरद काळे, रमणी काळे, राजू पोतदार, अशोक शितोळे, अमोल चौधरी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन दिनेश अडावतकर यांनी केली.

पुस्तकाचे प्रकाशन करणारे स्वामी सेवक जगदीश जाधव म्हणाले की, माणसांमधील देव पहायला शिकावे आणि गरजवंत आणि वंचितांना मदत करून आपल्या जाणीवा सिद्ध कराव्यात, असा संदेश दिला. पुस्तक निर्मितीबद्दल मीनाक्षी जयकर यांनी अनुभव कथन केले. या वेळी मुग्धा काळे, मोहन कुलकर्णी, मंजिरी काळे आणि डॉ.पराग कळण यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

# प्रा. शब्बीर हज्जू यांना पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावातील इंदापूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या द.ग. तटकरे महाविद्यालयातील प्रा.शब्बीर हज्जू यांना उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेना उपनेते व विधिमंडळ पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

प्रा.शब्बीर हज्जू हे माणगाव तालुक्यात बहुजन समाजात गेली अनेक वर्षे सामाजिक बांधिलकी व जातीय सलोखा राखून ते काम करीत असल्याने बहुजन समाजात त्यांनी आपली विशेष अशी ओळख निर्माण केली आहे.



याचबरोबर ते उत्तम असे निवेदक असून रायगड जिल्ह्यातील विविध व्यासपीठांवरून त्यांनी आपले बहारदार सूत्रसंचालन करून अनेकांची मने जिंकली आहेत.

एक प्रामाणिक व हुशार शिक्षक म्हणून त्यांच्याकडे तालुक्यात आदराने पहिले जाते. त्यांच्या या कार्याची दखल माणगाव तालुका पत्रकार संघाने घेत आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# मध्य रेल्वेतर्फे स्वच्छता पंधरवडा उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने १ ते १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत स्वच्छता पंधरवडा-२०२४चे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये रेल्वे स्थानके, रेल्वे, कार्यालये, वसाहती, कार्यशाळा, रुग्णालये, खाद्यपदार्थांचे स्टॉल इ. सर्व ठिकाणी स्वच्छतेमध्ये दृश्यमान सुधारणा सुनिश्चित करण्यासाठी चालणारी स्वच्छता पंधरवडा मोहीम आहे. ही मोहीम भारतीय रेल्वेने देशभरातील सर्व विभाग आणि कार्यशाळांमध्ये आयोजित केलेल्या स्वच्छता मोहिमेचा एक भाग होता.

'स्वच्छता पंधरवडा-२०२४' ची सुरुवात मुख्यालयात आणि सर्व विभागांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या संबंधित कामाच्या ठिकाणी 'स्वच्छता प्रतिज्ञा' देऊन झाली. पहिल्या दिवशी स्वच्छता जनजागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

गांधी जयंतीनिमित्त दुसरा दिवस खास होता, ज्यामध्ये मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धरम वीर मीना यांनी महात्मा गांधी आणि श्री लाल बहादूर शास्त्री यांना आदरांजली वाहिली. स्वच्छतेच्या विषयावर खास रंगवलेल्या ईएमयू रेक आणि लोकोमोटिव्हची पाहणी केली आणि त्यांना हिरवा झेंडा दाखवला. रांगोळी प्रदर्शन, प्रदर्शन आणि पथनाट्य हे देखील आयोजित केलेल्या उपक्रमांचा भाग होते.

स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी ख्यातनाम व्यक्तींनाही सहभागी करून घेण्यात आले. उदाहरणार्थ प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री, दिया मिर्झा हिने स्वच्छता मोहिमेचा एक भाग म्हणून शिवडी स्टेशनच्या पेंटिंग प्रकल्पात भाग घेतला.

मध्य रेल्वेने या पंधरवड्यादरम्यान विविध उपक्रम हाती घेतले आहेत. प्रत्येक दिवस स्वच्छ स्थानके (स्वच्छ स्थानके), स्वच्छ रेल गाडी (स्वच्छ गाड्या), स्वच्छ पटरी (स्वच्छ ट्रॅक), स्वच्छ परिसर (स्वच्छ कार्यस्थळ), स्वच्छ आहार (स्वच्छ खाद्यपदार्थ), स्वच्छ नीर (स्वच्छ पिण्याचे पाणी), स्वच्छ प्रसाधन आणि स्वच्छ पर्यावरण (स्वच्छ शौचालय आणि पर्यावरण), स्वच्छ स्पर्धा (स्वच्छता स्पर्धा), प्लास्टिकला नाही म्हणा आणि स्वच्छ समीक्षा (पुनरावलोकन/संक्षिप्त) या थीमसह साजरा करण्यात आला. या उपक्रमात रेल्वेचे अधिकारी, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

मध्य रेल्वेच्या मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर आणि भुसावळ विभागात स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. स्वच्छता पंधरवडा-२०२४ मध्ये मध्य रेल्वेच्या पर्यावरण आणि हाऊसकीपिंग विंगने उत्कृष्ट काम केले आहे. ९.९८ टन प्लास्टिक कचरा गोळा करून काढण्यात आला. १०९.९७ टन कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. ४६१.७ किलोमीटरचा ट्रॅक स्वच्छ करण्यात आला. ११६ किलोमीटर नाल्यांची स्वच्छता करण्यात आली. ९२०० व्यक्तींनी श्रमदानात सहभाग घेतला.

स्वच्छता प्रोटोकॉलचे पालन न केल्याबद्दल २६८ व्यक्तींना दंड ठोठावण्यात आला आणि त्यांच्याकडून ६८,१४० रुपये इतकी रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात आली. ३२ स्थानकांवर वेस्ट टू आर्ट सेल्फी पॉइंट्स बसवण्यात आले.

मध्य रेल्वे महाव्यवस्थापक श्री धरम वीर मीना यांनी स्वच्छता पंधरवडा अंतर्गत मुख्यालये आणि विभागांनी केलेल्या उपक्रमांचा बारकाईने आढावा घेतला आणि स्वच्छता पंधरवडा यशस्वी करण्यासाठी समर्पित भावनेने काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. स्वच्छतेसाठी सर्वांनी स्वेच्छेने काम करावे, सिंगल यूज प्लॅस्टिकविरोधात जनजागृती करावी आणि प्लास्टिकचा कमीत कमी वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस व्दारे तमाम लोकांस कळवीण्यात येते कि मौजे पिसार्वे, ता पनवेल येथिल खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील, वहीवाटीतील तसेच ७/१२ सदरी त्यांचे नावे असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरवीले आहे. सबब सदरहू मिळकतीचे मुळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तूतची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पिसार्वे, ता पनवेल, जि रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट/सर्व्हे नं. / हिस्सा न. | क्षेत्र हे. आर. प्रति | आकारणी रू. पैसे |
|---|---|---|---|
| राजेश उर्फ राजेशकुमार वसंतराय दोशी | १४६/१ | ०-३८-००<br>पो.ख. ०-३४-६०<br>एकूण ०-७३-४० | ३-११ |

सदरहू जागा, जमीन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क, गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्तखत, खरेदीखत, वचनचिठ्ठी, तारण, भाडेपट्टा हक्क, लिज, साठेकरार, कुलमूखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तीना इतर वारसांचा वा संबंधीताना हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर समक्ष तथा रजीस्टर पोस्टाने लेखी स्वरूपात कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत, तकार दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणाचाही कोणताही प्रकाचा दावा हक्क, हितसंबध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध, हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत व कायम स्वरूपी सोडून दिलेल्या आहेत असे गृहित धरून, आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पुर्ण करतील. मुदती नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व सदरच्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत. याची संबंधतांनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. श्री. संजय ग. पाटकर**
पत्ता :- बि १४, तळ मजला, राधा हरी निवास, - रतन टॉकीज समोर, लोकमान्य टिळक रोड, पनवेल, जि रायगड, ४१० २०६ मो. ९९२००२७७३८

**पनवेल.**
**दि. १७/१०/२०२४**


# वाचन महोत्सव साजरा करून वडगाव शाळेत कोजागरी पौर्णिमा



**चौक : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा वडगाव येथे वाचन महोत्सव साजरा करून विद्यार्थी , शिक्षक गगन भरारी आनंददायी कोजागिरी पौर्णिमा साजरी केली.

महावाचन महोत्सव ३०२४ या शालेय शिक्षण विभागाच्या राबविलेल्या उपक्रमात रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगावच्या तिसरी ते आठवीच्या ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यातील हर्ष एकनाथ गडगे इयत्ता पाचवी या विद्यार्थ्याने तिसरी ते ५ गटात तालुक्यात द्वितीय तर ६ बी ते ८ वी गटात, कृतिका गोपीनाथ गडगे आठवी प्रथम क्रमांक पटकावून या महावाचन व लेखन उत्सवात बाजी मारली. त्यांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या वेळी जल्लोष कोजागिरी कार्यक्रम घेऊन शाळेत विविध गुणदर्शन कार्यक्रम साजरा करण्यात आला. यात नवभारत साक्षरता अभियान व मतदान जनजागृती (SVEEP) बाबत जनजागृती करण्यात आली. या वेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष करुणा रवींद्र ठोंबरे, उपाध्यक्ष राजश्री नरेश जांभुळकर, महादेव कमलाकर गडगे, धीरज गडगे यांच्यासह निरीक्षर प्रौढ व्यक्ती, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी भोमकर काका यांनी लाईट व साऊंड सिस्टीम उपलब्ध करून दिली. सर्व मातापालक यांनी उत्तम सहकार्य केले. मिसळ पाव, केशर दुधाचा मुलांनी मनसोक्त आस्वाद घेतला.

या वेळी मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सर्वांचे स्वागत केले. वैजनाथ जाधव यांनी संचलन तर सरस्वती कवाद व मयुरी धायगुडे यांनी प्रमाणपत्र वितरण केले. मोहन दहिफळे, रवींद्र घोगरे सर यांनी नवभारत साक्षरता अभियानासाठी सहकार्य केले.

स्वयंसेविका निकिता गडगे, साक्षी जांभुळकर,वेदिका गडगे, आकांक्षा जाधव, भाग्यश्री तांबोळी यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

# शामराव पेजे महामंडळावर सुरेश मगर संचालक

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील कुणबी समाज नेते व रायगड जिल्हा ओबीसी जनमोर्चाचे अध्यक्ष सुरेश मगर यांची महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत शामराव पेजे कोकण व इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या अशासकीय संचालक मंडळावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

खासदार सुनील तटकरे यांच्या निकटवर्तीय म्हणून सुरेश मगर यांची ओळख आहे. सुरेश मगर यांनी रायगड जिल्ह्यात ओबीसी जनमोर्चाच्या माध्यमातून न्याय हक्कासाठी ओबीसीचे आंदोलन उभे केले होते. यासह त्यांनी जिल्ह्यातील कुणबी समाजाचे काम केले आहे. कुणबी समाज नेते म्हणून त्यांची ओळख असून समाजाच्या विविध समस्यासाठी सातत्याने त्यांनी पुढाकार घेतला आहे. संचालक मंडळावर निवड झाल्याने त्याचा फायदा रायगड जिल्हासह कोकणातील कुणबी समाजासाठी होणार आहे.



सुरेश मगर यांची संचालकपदी निवड झाल्यावर खासदार सुनील तटकरे, ना. अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, कुणबी समाजाचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हसकर, शिवराम शिंदे, माजी पंचायत समिती उपसभापती रामचंद्र सकपाळ, माजी नगराध्यक्ष लालता प्रसाद कुशवाह, ओबीसी जनमोर्चा रोहा तालुका अध्यक्ष अनंत थिटे, तळा तालुका अध्यक्ष सचिन कदम, उपसरपंच उत्तम नाईक, उपसरपंच अरविंद मगर, कोळी समाज नेते नवनीत डोलकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे ज्ञानेश्वर साळुंखे, कुणबी समाज धाटाव विभागाचे दिनेश राटाटे, केशव भोकटे, नामदेव म्हसकर, युवा नेते शशिकांत कडू, चंद्रकांत भगत आदीसह कुणबी समाज उन्नती संघाचे पदाधिकारी, ओबीसी जन मोर्चाचे पदाधिकारी, राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी यासह रायगड जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी



## दि पनवेल को अर्बन बँक लि.

**४७१, टिळक रोड, कापड बाजार, पनवेल-रायगड**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९८, १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ नुसार

## जाहीर लिलाव नोटीस

श्री. देवचंद जनार्दन कोळी रा. जेसल मेलोडी, ६०४, प्लॉट नं. ३०३/२, तक्का इंडिअन ऑईल पेट्रोल पंपाच्या मागे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि यांच्याकडून घेतलेल्या कर्जाचा भरणा न केल्यामुळे सहकारी न्यायालय अलिबाग, रायगड यांच्या कडे दावा क्र. सीसी/आरजीडी/९०/२०२१ निशाणी क्र.३८ दाखल करून बँकेने हुकुमनामा मिळविला आहे. सहकारी न्यायाल्याने सदरील व्यक्तीच्या मिळकती जप्त करून कर्ज रकमा, त्यावरील व्याज व त्यावरील अनुषंगिक खर्च वसूल करण्याचा हुकुम केला आहे. तसेच खाली सही करणा-यानेसुद्धा वेळोवेळी आदेश काढून गहाण ठेवलेली मिळकत दिनांक. १३.०६.२०२३ रोजी जप्त केली आहे.

तरी सर्व लोकांस कळविण्यात येते की, श्री. देवचंद जनार्दन कोळी यांनी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि यांच्याकडून घेतलेल्या कर्जासाठी खालील नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मिळकतीचा लिलाव जसे आहे आणि जेथे आहे त्या परस्थितीत मंगळवार दि.०५/११/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता बँकेच्या ४७१, टिळक रोड, कापड बाजार, पनवेल येथील बँकेच्या मुख्य कार्यालयात करण्यात येणार आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव आणि पत्ता | मिळकतीचे वर्णन | एरिया |
|---|---|---|---|
| १. | श्री. देवचंद जनार्दन कोळी रा. जेसल मेलोडी, ६०४, प्लॉट नं. ३०३/२, तक्का इंडिअन ऑईल पेट्रोल पंपाच्या मागे, ता. पनवेल, जि. रायगड | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील तक्का येथील शॉप नं. ११, तळमजला, श्री सिद्धीविनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ४२२, तक्का गाव, ता. पनवेल जि. रायगड | ११.१५ स्क्वेअर मीटर (कारपेट एरिया) आणि ३.७२ स्क्वेअर मीटर (लॉप्ट एरिया) |

सदरील कर्जाची दि. ३१.०५.२०२४ पर्यंत थकबाकी रु.२१,३०,७०३/- (अक्षरी एकवीस लाख तीस हजार सातशे तीन रुपये मात्र) अधिक ०१.०६.२०२४ पासून पुढील होणारे व्याज अधिक होणारा खर्च, माननीय जिल्हा उपनिबंधक साहेब अलिबाग यांनी जरी त्यांच्या आदेशाने सदरील मिळकतीची अपसेट किंमत रु. १६,२०,०००/-एवढी मान्य केली असली, तरी बँकेने दुय्यम निबंधक कार्यालय पनवेल यांच्याकडून सदरील मिळकतीचे मुल्यांकन मागविले असता त्यांनी सदर मिळकतीचे रु.१६,२०,०००/- एवढे मुल्यांकन करून दिले आहे त्यामुळे त्यापेक्षा कमी रकमेची बोली रक्कम स्वीकारली जाणार नाही. लिलावात भाग घेणाऱ्यांनी इसारा रक्कम बँकेच्या नावाने बँकेत अनामत रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टने रु.१,०८,०००/- वरील लिलावाच्या तारखेच्या किमान ५ दिवसापूर्वी (कामकाजाच्या दिवशी ) भरणा करावा लागेल जास्तीत जास्त बोली लिलावामध्ये मंजूर केली जाईल. त्यावेळी त्या व्यक्तीला त्याच्या बोली रकमेच्या १/३ रक्कम बँकेत लिलावाच्या तारखेपासून आठ दिवसाच्या आत अनामत म्हणून भरावी लागेल. तसेच बाकीची संपूर्ण रक्कम लिलावाच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत भरावी लागेल. त्यानंतरच बँक त्यांच्या मिळकतीचा विक्रीचा दाखला देईल. तसेच स्टॅम्प ड्युटी, नोंदणी खर्च व इतर खर्च लिलाव घेणाऱ्याने करावयाचा आहे.

कोणतेही कारण न देता लिलाव मंजूर करणे अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार वसुली व विक्री अधिकारी यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे. लिलावाच्या बाकीच्या सर्व अटी व नियम शाखाधिकाऱ्यांकडे व खालील सही करणाऱ्यांकडे उपलब्ध आहेत व त्या बँकेच्या कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आणि त्या लिलावामध्ये भाग घेणाऱ्यांस बंधनकारक आहेत याची नोंद घ्यावी.

**स्थळ : पनवेल**
**दिनांक : १८.१०.२०२४.**

**सही/-**
**वसुली व विक्री अधिकारी**
दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल

# पनवेलच्या उमेदवारीसाठी 'मविआ'त रस्सीखेच

## शिरीष घरत, बाळाराम पाटील, लीना गरड इच्छुक; वाक्युद्ध सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी मिळविण्यासाठी महाविकास आघाडीमधील शिवसेना ठाकरे गट आणि शेतकरी कामगार पक्ष या घटक पक्षांमध्ये आपसांत रस्सीखेच सुरू आहे.



पनवेलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी २०१९च्या निवडणुकीत शेकाप उमेदवाराचा ९२ हजार ७३० मतांनी पराभव करून तिसऱ्यांदा आमदारकी मिळविली. पनवेल विधानसभा क्षेत्रात सध्या पाच लाख ५४ हजार ३१ मतदार आहेत. यामध्ये स्त्री मतदारांची संख्या दोन लाख ५७ हजार १४० आहे. लाडकी बहीण योजनेमुळे महायुतीच्या उमेदवारांसाठी हा मतदारसंघ सुरक्षित मानला जातो.

पनवेलच्या महाविकास आघाडीमधील घटक पक्षांमध्ये असणाऱ्या शेकापचे बाळाराम पाटील यांनी अनेकदा पनवेल विधानसभा मतदारसंघातून नशीब आजमवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना एकदाही मतदारांनी भरघोस मतांचा आशीर्वाद दिला नाही. तरीही मागील दोन आठवड्यांपासून शेकापच्या पाटील यांनी उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच प्रचाराची जोरदार आघाडी घेतली आहे.

पनवेल विधानसभा क्षेत्रात शहरी मतदारांचा टक्का मोठा असल्याने शेकाप, शिवसेना ठाकरे गट आणि भाजप या तिन्ही पक्षांनी शहरी मतदारांवर लक्ष केंद्रित केले आहे. शिवसेनेचे पनवेल जिल्हाध्यक्ष शिरीष घरत हेसुद्धा उमेदवारी मिळण्यासाठी इच्छुक असल्याने महाविकास आघाडीत पारंपरिक शेकापकडे असणारा पनवेल विधानसभा मतदारसंघ शिवसेनेला (ठाकरे गट) मिळतोय का अशी चर्चा पनवेलमध्ये सुरू झाली आहे. शिवसेनेच्या माजी नगरसेविका लीना गरड यांनीही 'मातोश्री'च्या वरिष्ठांकडे उमेदवारीसाठी मागणी केल्यामुळे ठाकरे सेनेतून दोन इच्छुक आहेत.

उद्धव ठाकरे यांनी यापूर्वी जाहीर व्यासपीठावरून अनेकदा पनवेलवर भगवा फडकविण्याची इच्छा व्यक्त केली. पनवेलमध्ये अनेक वर्षे ठाकरे कुटुंबीयांचे वास्तव्य होते. त्यामुळे आजोबांच्या कर्मभूमीत ठाकरेंच्या सेनेचा भगवा फडकविण्यासाठी ठाकरे यांनी पनवेल विधानसभेवर दावा सांगितल्याचे बोलले जात आहे, परंतु अजूनही महाविकास आघाडी आणि महायुती पनवेलमधील दोन्ही परस्परविरोधी राजकीय पक्षांच्या विरोधी स्पर्धकांनी त्यांचा प्रचार स्वयंघोषित पद्धतीने सुरू केला आहे.

शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी महाविकास आघाडीचा उमेदवार जाहीर होण्यापूर्वीच उरण विधानसभा क्षेत्रात प्रचार सुरू केला आहे. कर्जत, महाड व उरण हे तीन विधानसभा मतदारसंघांवर यापूर्वी शिवसेनेकडून दावा केला जात होता. प्रीतम म्हात्रे यांनी प्रचारात घेतलेल्या आघाडीमुळे पारंपरिक उमेदवारी वाटपाची समीकरणे बदलली आहेत. २०१९च्या निवडणुकीत उरण मतदारसंघातून आमदार महेश बालदी यांनी अवघ्या ५,७१० मतांनी शिवसेनेच्या मनोहर भोईर यांचा पराभव केला होता. त्यामुळे हा मतदारसंघ म्हात्रे यांना सुरक्षित वाटत आहे. शिवसेना ठाकरे गटाला उरणमधून उमेदवारी न मिळाल्यास शेकाप व शिवसेनेमधील वादामुळे महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची जोरदार चर्चा उरणमध्ये आहे.

> **मी इच्छुक आहे. त्यासाठी मी उद्धव ठाकरे यांच्यासह अनेकांची भेट घेतली. लीना गरड यांना पक्षाने महानगर महिला संघटकपद दिल्यानंतरही त्या कॉलनी फोरमच्या माध्यमातून काम करत असल्याचे दिसते. महाविकास आघाडी आणि शिवसेनेने (ठाकरे गट) मला अद्याप उमेदवारी दिली नसली तरी शिवसेना पक्ष मलाच उमेदवारी देईल यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत.**
> **–शिरीष घरत,**
> **जिल्हाध्यक्ष, ठाकरे गट**

### मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान

# शाहू महाराज विद्यालय राज्यात ठरले द्वितीय

**नवी मुंबई : बातमीदार**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे विविध स्पर्धात्मक उपक्रमांवर आधारित अभियान मागील वर्षी यशस्वी झाल्यानंतर यावर्षी दुसरा टप्पा ५ ते १५ सप्टेंबर या कालावधीत राज्यभरात उत्साहाने राबविण्यात आला. त्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय नमुंमपा शाळा क्र. ५५, आंबेडकर नगर, राबाडे या शाळेने अभियानात सहभागी ९८ हजारहून अधिक शाळांतून राज्यात द्वितीय क्रमांक संपादन केलेला आहे.



एनसीपीए, मुंबई येथे झालेल्या समारंभात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते, शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर, शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, शिक्षण विभागाचे आयुक्त सुरज मांढरे व इतर मान्यवर अतिथींच्या उपस्थितीत नवी मुंबई महापालिकेच्या वतीने शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे, शिक्षणाधिकारी अरूणा यादव, शिक्षण विस्तार अधिकारी सुलभा बारघरे व शाळेच्या मुख्याध्यापिका रंजना वनशा व इतर शिक्षकांनी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात राज्यात व्दितीय क्रमांकाचा हा मानाचा पुरस्कार स्विकारला.

या पुरस्काराच्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण व्हिजनवर गुणवत्तेची मोहर उमटलेली असून महापालिकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे आणि याचे श्रेय नमुंमपा शिक्षण विभाग, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक यांना असल्याचे सांगत नमुंमपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे यांनी संबंधित सर्व घटकांचे व नवी मुंबईकर नागरिकांचे अभिनंदन केले आहे.

सर्व बाजूने उजवेपण जपणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, आंबेडकर नगर, रबाळे हे मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानामध्ये राज्यात ९८ हजारहून अधिक शाळांतून व्दितीय क्रमांकाचे मानकरी ठरले असून हे यश सांघिक प्रयत्नांमुळे प्राप्त झालेले आहे.

# पालक-पाल्य ऋणानुबंध कार्यशाळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ सेवा नेरूळ केंद्र यांच्या विद्यमाने बाल संस्कार व युवा प्रबोधन विभाग अंतर्गत पालक-पाल्य ऋणानुबंध कार्यशाळा सेक्टर १८ नेरूळ येथे झाली.



प्रारंभी, सध्याच्या काळातील पालक व पाल्यांमधील बदलत चाललेल्या नातेसंबंधांमधील आवाहनांना यशस्वीरित्या सामोरे जाण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजक स्वप्नील घोलप यांनी सांगितले.

या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्रीगुरुपीठाच्या वक्त्या प्रतीक्षाताई येवले व कविताताई चोर्डेकर यांनी पाल्य आणि पालक यांच्या जीवनातील ऋणानुबंध पुन्हा जागृत करण्याचे काम केलं. सद्याच्या बदलत्या आणि धावत्या युगात आपण आपल्या पाल्याकडे कसे दुर्लक्ष करत असतो आणि त्यांच्याकडून कशा पद्धतीने अपेक्षा ठेवत असतो हे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून सर्व पालकांना सांगितले. पाल्यानीसुद्धा आपले ध्येय निश्चित करून ते साध्य कसे करावे आणि पालकासोबत कसे वागले पाहिजे, आई वड़िलाचा आदरतिथ्य कसा ठेवला पाहिजे, आपण आपली नाती कशी जपली पाहिजे यावर विविध उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमातून आम्हास प्रचंड ऊर्जा मिळाली आणि जिव्हाळ्याची नाती जपण्याची जबाबदारी आम्ही आत्मीयतेने पार पाडु, असे कार्यशाळेत सहभाग घेतलेल्या पालकांनी आपल्या अभिप्रायात सांगितले. या सर्व कार्यक्रमाचे नियोजन स्वप्नील घोलप तसेच श्री स्वामी समर्थ सेवा नेरूळ केंद्र, प्रतिनिधी व सर्व युवा प्रतिनिधी यांनी केले होते.

# 'लाडकी बहीण' कुटुंब भेट अभियान

**पनवेल : वार्ताहर**

मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख यांच्या आदेशाने समस्त महाराष्ट्रातील शिवसैनिक मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ घेलेल्या बहिणीकडे त्यांच्या घरी कुटुंबाची भेट घेण्यासाठी जात आहे.



या भेटीत त्या बहिणीला इतर अनेक योजनांची माहिती दिली जात आहे, योजनेबाबत विरोधकांनी पसरविलेले गैरसमज दूर केले जात असून घरातील वयोवृद्धांसाठी वयश्री योजना सांगून त्याचे फॉर्म भरले जात आहेत, घरातील युवती जी कॉलेजला शिकत आहे तिचे सरकारमार्फत मोफत शिक्षण होणार आहे. ह्याबाबत माहिती दिली जात आहे तसेच घरातील तरुण युवकाला स्वावलंबी बनविण्यासाठी सरकारची युवा प्रशिक्षण योजना सांगितली जात आहे. ह्याचबरोबर सरकारच्या इतर योजना यांचा प्रसार व प्रचार केला जात आहे. एकूणच एका संपूर्ण कुटुंबाला योजनांच्या माध्यमातून स्वावलंबी कुटूंब बनविण्यासाठी ही लाडकी बहीण कुटुंबभेट योजना राबवली जात आहे, युवासेनेचे राज्य सचिव तथा हया योजनेचे कोकण समन्वयक, उरण विधानसभेचे पक्षाचे निरीक्षक रूपेश पाटील यांच्या निरीक्षणाखाली ही मोहीम गवगावात राबविली जात आहे.

शिवसेनेचे मुख्य पदाधिकारी, महिला उपजिल्हा प्रमुख वैजयंती ठाकूर ज्या ह्या योजनेच्या उरण विधानसभेच्या अशासकीय सदस्या आहेत, विधानसभा संघटक मनोज घरत, सह संपर्क प्रमुख रमेश म्हात्रे, तालुका प्रमुख महेंद्र पाटील, सोनल घरत, कृष्णा पाटील, अक्षय म्हात्रे व शिवसेना-महिला आघाडी-युवासेना पदाधिकारी प्रत्येक गावागावात जाऊन ही भेट घेत आहेत आणि आलेल्या समस्यांबाबत तहसील व बँक प्रशासना सोबत चर्चा ही करत आहेत. ह्याबाबत सर्व अहवाल, लाभ मिळालेल्या बहिणींची आकडेवारी, समस्या ह्याबाबत चा सगळा अहवाल हा वरिष्ठांना निरीक्षक रुपेश पाटील यांच्याकडून दिला जात आहे.

# नेरूळ, बेलापूरमध्ये कोट्यवधींच्या विकासकामांचे भूमिपूजन

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांच्या अथक प्रयत्नांतून व आमदार निधीमधून नवी मुंबई शहरामध्ये विकास कामांची भूमिपूजने व लोकार्पण करण्यात येत आहेत. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मंगळवारी बेलापूर मतदार संघातील सीबीडी व नेरूळ येथे विविध विकास कामांचा भूमिपूजन व उद्घाटन झाले.

सीबीडी येथील सेक्टर ८ बी येथे दलित वस्ती असून सदर ठिकाणी नागरिकांना व लहान मुलांना फेरफटका मारण्यासाठी व खेळण्याकरिता उद्यान नसल्यामुळे नागरीकांना विरंगुळा उपलब्ध होत नव्हता. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेंतर्गत १५ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला. सीबीडी सेक्टर ८ बी येथील क्रांतीवारी वासुदेव बळवंत फडके या उद्यानाचा विकास व सौंदर्यकीकरण करण्यात येणार आहे. त्यामध्ये अत्याधुनिक सोलर बँचेस, गजेबो, एलईडी ग्लोबल टनल, डान्सिंग फ्लोअर लाईट, अत्याधुनिक प्रवेशद्वार, प्रस्तरारोहन भिंत, एफआरपी भिंत, सेल्फी पाँइट, गोबो आणि वेब प्रकारातील थीम उभारणे अशा विविध प्रकरच्या लायटिंग शो उभारण्यात येणार असून नवी मुंबईतील एकमेव असा उद्यान निर्माण होणार आहे. त्यामुळे येथील सीबीडी वासियांना सुंदर असा एक मॅजिक गार्डन पाहवयास मिळणार आहे.



यामुळे सीबीडी सेक्टर - ८ बी येथील क्रांतीवारी वासुदेव बळवंत फडके या उद्यानाचा कायापालट होणार असून सीबीडी वासियांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून आमदार मंदा म्हात्रे यांचे कौतुक होत आहे.

आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार निधी मधून २० लाख रुपये उपलब्ध करून नेरूळ प्रभाग क्र. ८४ येथील नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान येथे ज्येष्ठ नागरिकांकरिता विरंगुळा केंद्राचे भूमिपूजन स्थानिक ज्येष्ठ नागरिकांच्याहस्ते करण्यात आले. आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार विकास निधी मधून रक्कम २० लाख रुपये खर्च करून नेरूळ विभागातील सेक्टर २ व ४ मधील परिसरात लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. त्यामुळे नेरूळ विभागातील सेक्टर - २ व ४ हे तिसऱ्या डोळ्याच्या कक्षेत असणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

सीबीडी सेक्टर ८ बी येथील क्रांतीवारी वासुदेव बळवंत फडके या उद्यानाचा कायापालट होणार असून सीबीडी वासियांमध्ये व नेरूळ विभागातील सेक्टर २ व ४ मधील रहिवाश्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून आमदार मंदा म्हात्रे यांचे कौतुक होत आहे.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत सुहासिनी नायडू, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष सी.व्ही. रेड्डी, गोपाळराव गायकवाड, रवि ठाकूर, राजू कोळी, देविका करपे, अलका कामत, जयराम पासवान, कांतीभाभी, नम्रता पवार, जयसिंग पवार, सुवर्णा होसमानी, प्रणीत सिन्हा, मकरंद म्हात्रे, मनोज मेहेर, सुजाता होगाडे, शेळकुमारी ओझा, आशा वाधवा, सुषमा कोडक, सत्यम वेंगुलेकर, अरुणकुमार सिंग तसेच असंख्य नागरिक उपस्थित होते.

# प्रामाणिकपणाबद्दल महिलेचा सत्कार

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील खोपटे गावातील द.पी.पाडा येथील श्री.कृष्ण गणेश मंडळाच्या गणपती विसर्जन मिरवणुकीत महिलेच्या गळ्यातील सोन्याचा हार तुटून गहाळ झाला होता. हा अडीच तोळ्याचा सोन्याचा हार याच खोपटे गावातील शेवंता अशोक ठाकूर या महिला भगिनीस मिळाला होता. या महिलेने सोन्याचा हार विलंब न करता स्वतःचा प्रामाणिकपणा दाखवून परत केल्याने या महिलेच्या प्रामाणिकपणाचे खोपटे परिसरात कौतुक होत आहे. खोपटे गावातील सामाजिक कार्यकर्ते अनंत ठाकूर यांच्या सुनबाई आरती ठाकूर या महिलेच्या गळ्यातील हा हरवलेला सोन्याचा हार होता.



या शेवंता ठाकूर या महिलेच्या प्रामाणिकपणा पाहून येथील श्री. कृष्ण गणेश मंडळाने सोन्याचा हार सुपूर्द केलेल्या महिला भगिनीला साडीवस्त्र, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले. याशिवाय या महिलेला या सहानभूतीच्या कृतीबद्दल रोख रकमेचे पाकीट देण्यात आले, मात्र या महिलेने सन्मानाचा स्विकार केला. रोख रकमेचे पाकीट घेण्यास स्पष्ट नकार दिला. यावरून या महिला भगिनीची लोभ न करता प्रामाणिकता हे माझे कर्तव्य असल्याचे सबंधितांना सांगितले.

या वेळी खोपटे द.पी.पाडा. येथील गाव अध्यक्ष यशवंत ठाकूर, कल्पेश ठाकूर, भरत म्हात्रे, शालिनी ठाकूर, मंगला ठाकूर, सुमती ठाकूर यांच्यासह ग्रामस्थ व महिला भगिनी उपस्थित होत्या.

दरम्यान, महिलेच्या प्रामाणिकपणाचे खोपटे गावातून कौतुक होत आहे.

# बाळावर दुर्मिळ सर्जरी यशस्वी

**नवी मुंबई :** अपोलो हॉस्पिटलमध्ये क्रेनियोसायनोस्टोसिससाठी एन्डोस्कोपिक सर्जरी यशस्वीपणे केली गेली. ही एक अतिशय दुर्मिळ स्थिती आहे, यामध्ये बाळाच्या डोक्याची हाडे वेळेआधीच जुळतात. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईतील कन्सल्टन्ट न्यूरोसर्जरी डॉ. सुमीत पवार यांनी तीन महिन्यांच्या बाळावर ही क्रांतिकारी प्रक्रिया केली. २००० पैकी फक्त एक बाळामध्ये ही दुर्मिळ स्थिती आढळून येते, यामुळे डोक्याच्या विकासामध्ये बाधा येतात. ही स्थिती वेळीच लक्षात येणे आवश्यक असते कारण वेळेवर उपचार केल्यास नंतरच्या काळात मोठ्या सर्जरीची आवश्यकता रोखली जाऊ शकते.

# स्टर्लिंग कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई सिवुड्स येथील एनसीआरडी स्टर्लिंग इन्स्टिटयूट ऑफ मॅनॅजमेन्ट स्टडीज, नेरूळ येथे सातवी एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदनॅव्हिगेटिंग भविष्य: नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वसमावेशकता आणि विविधता व्यवस्थापित करणे या विषयावर झाली.

या परिषदेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांचे भविष्यातील सर्वसमावेशकता आणि विविधता या विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी उद्योग विश्वा सह अनेक नामांकित शिक्षण संस्था, विद्यापीठातील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती.

एनसीआरडी स्टर्लिंग इन्स्टिटयूट ऑफ मॅनॅजमेन्ट स्टडीज, नेरूळचे संचालक डॉ. मुरलीधर धनवडे यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली हि एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वीरीत्या पार पडली. या परिषदेत संस्थेचे सचिव निरंजन केळशीकर, खजिनदार अविनाश शिंदे आणि मुख्य प्रशासकीय अधिकारी अमरजीत खराडे यांची उपस्थिती आणि मार्गदर्शन लाभले.

या परिषदेसाठी १३० पेक्षा अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रिसर्च पेपर मिळाल्याचे परिषदेच्या आमंत्रक डॉ. अर्जिता जैन यांनी नमूद केले. एमबीए आणि एमसीएच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी येस बँकेचे उपाध्यक्ष दीपक शर्मा उपस्थित होते. त्यांनी बँकिंग क्षेत्रातील सर्वसामान्य लोकांची सर्वांत मोठी सर्वसमावेशकता याविषयी मार्गदर्शन केले.

या आंतरराष्ट्रीय परिषदेत ३७ वर्षांचा अनुभव असलेले डॉ. संदीप इनामदार, उपाध्यक्ष, विश्वनिकेतन यांनी त सर्व उपस्थितांना सर्वसमावेशकता आणि विविधता याचे महत्त्व काही उदाहरणांच्या आधारे सखोलपणे समजावण्याचा प्रयत्न केला. कल्पेश आमीन, बर्लिंग्टन टीचिंग अँड ट्रेनिंग हेड यांनी ब्लॉकचेन या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून टेम्परप्रूफ रेकॉर्ड, विकेंद्रीकरण, मशीन लर्नींग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयांवर संवाद साधला.

पेट्रासिस ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेड चे संस्थापक डॉ. फिलिप कॅसी यांनी त्यांचा अनुभवातील काही मजेशीर किस्से सांगून हास्यमय वातावरण निर्माण केले. यासह एसएनडीटी विद्यापीठाचे निबंधक, डॉ. विलास नांदवडेकर यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या समान संधीवर आपले मत व्यक्त केले. परिषदेच्या आमंत्रक डॉ. प्रगती गोयल यांनी सर्व मान्यवरांचे, उपस्थितांचे, प्राध्यापक वृंदाचे आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# दारू जप्त, १९ आरोपींना अटक

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची आचारसंहितेदरम्यान कारवाई

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून १५ व १६ ऑक्टोबरपर्यंत एकूण १८ गुन्हे नोंदविण्यात आलेले असून १९ आरोपीना अटक करण्यात आली आहे. संपूर्ण कारवाईमध्ये ५०६०.१२ लिटर दारू जप्त करण्यात आली. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत रुपये दोन लाख ७१ हजार ४२५ आहे.





अवैध मद्याच्या व्यवसायात गुंतलेल्या सराईत इसमांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९मधील कलम ९३ अंतर्गत एकूण ६० प्रस्ताव विधानसभा मतदारसंघातील उपविभागीय दंडाधिकारी यांच्याकडे दाखल करण्यात आले असून पैकी १३ कलम ९३ अंतर्गत बंधपत्र करून घेण्यात आले आहेत तसेच संशयित आरोपी ज्ञात पत्यावर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३च्या कलम १६८ (फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४९) नुसार संबंधितांना गुन्ह्यापासून परावृत्त करण्याकरिता एकूण ३६२ कायदेशीर नोटीस देण्यात आल्या आहेत.

रायगड जिल्ह्यात विधानसभा निवडणूक आचारसंहिता कालावधीत सर्व मद्य उत्पादक घटक, ठोक विक्री व किरकोळ विक्री अनुज्ञप्तीवर प्रभावी नियत्रंण ठेवण्याकरिता अनुज्ञप्त्यांच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत तसेच कंट्रोल रुम या कार्यालयात कार्यान्वित करण्यात आले.

विधानसभा निवडणूक आचारसंहिता कालावधीत या विभागाची सात पथके तैनात असून पथकांस आंतरराजीय मद्य तस्करी होणार नाही तसेच बेकायदेशीर हातभट्टी दारूनिर्मिती व विक्री केंद्र व वाहतूक यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. कोणत्याही प्रकारची अवैध मद्य वाहतूक होणार नाही याकरिता रायगड जिल्ह्यात शेडूंग (ता. खालापूर), खारपाडा (ता. पेण) व चांदवे (ता. पोलादपूर) येथे दोन तपासणी नाके उभारण्यात आले असून तेथे संशयित वाहनांची सखोल तपासणी करण्यात येत आहे. तसेच अवैध मद्यविक्री करणारे ढाबे हॉटेल/टपऱ्या यांच्यावर वारंवार कारवाई करण्यात येत आहे.

सर्व नागरिकांनी विधानसभा निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडावी याकरिता विधानसभा मतदारसंघात मतदारांना दारुचे प्रलोभन देत असल्याचे निदर्शनास आल्यास तसेच अवैध मद्य निर्मिती व विक्रीबाबत काही तक्रारी असल्यास या विभागाचा व्हॉटस अॅप क्र.८४२२००११३३, टोल फ्री क्र.१८००२३३९९९९ व अधीक्षक कार्यालय रायगड येथील दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२८००१वर संपर्क साधावा.

# नामनिर्देशनपत्र दाखल करताना तीनपेक्षा जास्त वाहने नकोत!

## दालनात पाच व्यक्तींव्यतिरिक्त प्रवेश नाही

**रायगड : रामप्रहर वृत्त**

निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहने यांचा ताफ्यात समावेश नसावा तसेच उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पाच व्यक्तीव्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही.

याशिवाय नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक/सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे/वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी लागू केले आहेत.

निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ ऑक्टोबर रोजी कार्यक्रम घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अमलात आलेली आहे. जिल्हादंडाधिकारी जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३चे कलम १६३ अन्वये १६ ऑक्टोबर ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (२५ नोव्हेंबरपर्यंत) प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

निवडणुकीच्या कालावधीत जिल्ह्यात निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या वाहने यांचा ताफ्यात समावेश नसावा तसेच उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पाच व्यक्तींव्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक/सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे/वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे आदेश लागू केले आहेत.

# खोपोलीत एका अल्पवयीन मुलीचे अपहरण, दुसरीचा विनयभंग

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील साजगाव येथून अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची घटना घडली असून दुसऱ्या घटनेत खोपोलीत अल्पवयीन मुलीचा तिच्या अल्पवयीन मित्रानेच विनयभंग केल्याची घटना घडली आहे.

पहिल्या घटनेत साजगाव येथे पोटापाण्यासाठी राहणारा परप्रांतीय बलीराम (मूळ बिहार) याच्या १७ वर्ष नऊ महिने वयाच्या मुलीला अज्ञात व्यक्तींने फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी मुलीच्या पालकांनी अज्ञात इसमाविरुद्ध तक्रार दिली असून अधिक तपास सुरू आहे.

दुसऱ्या घटनेत खोपोली शास्त्रीनगर येथे राहणाऱ्या पंधरा वर्ष मुलीला तिच्या कॉलेजला शिकणारा मित्राने आईला भेटण्यास चल असे खोटे बोलून त्याच्या घरी घेऊन गेला. या वेळी त्याने जबरदस्तीने तिच्याशी अश्लील वर्तन करून फोटो मोबाईल फोनमध्ये काढले तसेच याबाबत कोणाला काही सांगितलेस तर मारून टाकेन अशी धमकी दिली.

याबाबत पीडित मुलीने घरी आईला सांगितल्यावर खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अल्पवयीन असून पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## चौकीदार पदासाठी माजी सैनिकांना आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील बाह्ययंत्रणेद्वारे माजी सैनिक संवर्गातून बहुउद्देशीय स्वरूपाच्या अशासकीय चौकीदार कर्मचारी भरती करण्यात येणार असून पात्र माजी सैनिकांनी २५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग ले. कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत्त) यांनी केले आहे.

याकरिता माजी सैनिक उमेदवाराचे शिक्षण इयत्ता दहावी पास अथवा सैन्यदलाकडून समकक्ष प्रमाणपत्र असावे. भारतीय सेनेमध्ये कमीत कमी १५ वर्षे सेवा झालेली असावी. माजी सैनिकांसाठी लागणारी कागदपत्रे-आधार कार्ड, पॅन कार्ड, सैन्यसेवा पुस्तकाची छायांकित प्रत, माजी सैनिक ओळखपत्र आवश्यक आहे.

# आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या फंडातून पिंगोडे शाळेस डिजिटल प्रोजेक्टर भेट

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील पिंगोडे येथील द.ग. तटकरे माध्यमिक शाळेस कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या आमदार फंडातून भाजप रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड यांच्या हस्ते डिजिटल प्रोजेक्टर देण्यात आला.



दरम्यान, आमदार म्हात्रे यांच्या फंडातून कोकण विभागात पालघर ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बाराशे शाळांना प्रोजेक्टर व इतर शालोपयोगी वस्तू भेट देण्यात आल्या असल्याची माहिती लाड यांनी दिली.

पिंगोडे येथील कार्यक्रमास भाजप युवा नेते व माजी उपसरपंच राजेंद्र लवटे, भाजप तालुका उपाध्यक्ष विठोबा माळी, शिक्षण सेल तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे, माजी सरपंच कांचन माळी, माजी उपसरपंच सखाराम घासे, रंजना माळी, माजी सदस्य कुसुम बावकर, गीता पाटील, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा पारंगे आदींसह शिक्षक व विद्यार्थी आदी बहुसंख्येने उपस्थित होते.

याबद्दल उपस्थितांनी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे आभार मानले आहेत.

## पीक विमाधारक शेतकऱ्यांना आवाहन

**चौक : प्रतिनिधी**

पीक विमाधारक शेतकऱ्यांनी पीक नुकसानीच्या पूर्वसूचना विमा कंपनीस द्याव्यात, असे आवाहन खालापूर तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर यांनी केले आहे.



गेले काही दिवस परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे बहुतांशी शेतकरी यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खरीप हंगाम सन २०२४-२५मध्ये शासनाने सर्वकष पीक विमा योजनेस मान्यता दिली आहे. या योजनेत शेतकऱ्यांनी प्रती अर्ज एक रुपया भरून सहभाग नोंदविला आहे. उर्वरित शेतकरी हिस्सा रक्कम ही शासनामार्फत भरण्यात आली आहे.

खालापूर तालुक्यातून १९६७ शेतकरी अर्ज कंपनीकडे विमा काढण्यासाठी प्राप्त झाले आहेत. यामध्ये ९७१.२५ हे क्षेत्राचा विमा शेतकऱ्यांनी उतरविला आहे. शेतकऱ्यांनी प्रती अर्ज एक रुपयाप्रमाणे ३६२३ रुपये विमा हप्ता भरला आहे, अशी माहिती खालापूर तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर यांनी दिली.

सध्या नैसर्गिक भात पीक हे कापणीच्या अवस्थेत आहे. मागील आठवड्यापासून दररोज संध्याकाळी पाऊस पडत असून खाचरात पाणी साचत आहे तसेच काही ठिकाणी वाऱ्यामुळे पीक शेतात आडवे झाले आहे. त्यामुळे कापणी करता येत नाही व शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे प्रगत आणि इस्रायल रिटर्न शेतकरी हरेश पाटील माडप यांनी सांगितले.

दरम्यान, पीक विमा कंपनीला टोल फ्री नंबर १४४४७वर संपर्क साधून किंवा क्रॉप इन्शुरन्स मोबाईल अॅपवरून किंवा चोलामंडलम एम.एस. जनरल कंपनीचे तालुका प्रतिनिधी कार्यालय श्री सदगुरु निवास, १२४/२, युनियन बँकेसमोर, मुंबई-पुणे महामार्ग, शास्त्री नगर, खोपोली ४१०२०३ यांच्याकडे ७२ तासांच्या आत पूर्वसूचना द्यावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर यांनी शेतकऱ्यांना केले आहे. अधिक माहितीसाठी पीक विमा कंपनी तालुका प्रतिनिधी अरुणा रिंगे (९७०२०२९१४२) यांच्याशीदेखील संपर्क साधावा.

# बदलत्या हवामानाची आव्हाने पेलण्यासाठी संशोधन केंद्राला निधीची गरज -डॉ. भरत वाघमोडे

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

बदलत्या हवामानाने निर्माण केलेली आव्हाने पेलण्यासाठी संशोधन केंद्र अद्यावत करणे आवश्यक असून त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे यांनी येथे केले.




अखिल भारतीय समन्वित भात सुधार प्रकल्प देखरेख पथकातील तज्ज्ञ शास्त्रज्ञांसोबत संशोधन केंद्राच्या प्रशिक्षण सभागृहात आयोजित बैठकीत ते अध्यक्षीय मार्गदर्शन करीत होते.

देखरेख पथकात हैदराबादच्या भारतीय कृषी संशोधन परिषद आणि आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्थेत कार्यरत वनस्पती रोगशास्त्र विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. जी. एस. लाहा, कृषिविद्या विभागाच्या प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. श्रीदेवी, वनस्पती पैदास विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. कृष्णमूर्ती, संकरित भात विभागाच्या वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. पी. रेवथी, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ डॉ.बंडेप्पा, जैवतंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. देवन्ना यांचा समावेश होता.

डॉ. वाघमोडे यांनी अखिल भारतीय समन्वित भात सुधार प्रकल्प २०२४च्या अहवालाचे सादरीकरण केले. ते म्हणाले की, पायाभूत सुविधा निर्माण झाल्यास कर्जतच्या संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन करण्याची क्षमता आहे.

या वेळी देखरेख पथकातील तज्ज्ञ शास्त्रज्ञांनी मनोगत व्यक्त करीत संशोधन कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. सुरुवातीला भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए. पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त सर्वांनी अभिवादन केले. सूत्रसंचालन विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले. आभार वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. पुष्पा पाटील यांनी मानले.

## 'जुने वृत्तपत्र रद्दी विक्रीसाठी दरपत्रके सादर करावीत'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग या कार्यालयातील सप्टेंबर २०२३ ते जून २०२४ या कालावधीतील जुन्या वृत्तपत्रांची रद्दी विक्री करावयाची आहे.

यासाठी स्थानिक रद्दी विक्रेत्यांनी आपली दरपत्रके बंद लिफाप्यात २२ ऑक्टोबरपर्यंत जिल्हा माहिती कार्यालय,रायगड-अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाशेजारी, अलिबाग येथे सादर करावीत, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी यांनी केले आहे.

# रायगडचा जिताडा मासा नामशेष होण्याच्या मार्गावर

**पाली : प्रतिनिधी**

बडे उद्योगपती, मोठ मोठ्या नेत्यांना रायगडच्या जिताडा माशाच्या चवीची भुरळ पडते. वैशिष्ट्यपूर्ण चव असलेला रायगडचा हा जिताडा मासा आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे ही खवय्ये व मत्स्यप्रेमींसाठी चिंतेची बाब असल्याचे बोलले जातेय.



कोकणातील जिताडा माशाचे महत्त्व व ख्याती ज्यांनी जिताडा चाखला आहे ते अधिक चवीने सांगू शकतील. पूर्वी समुद्रातून खाडीत आणि खाडीतून थेट भातशेतीत जिताडे प्रवेश करायचे. भात कापणीच्या काळात कोकणात हमखास घराघरात जिताड्याचा बेत ठरलेला असायचा. जिताड्याच्या चवीची ख्याती इतकी पसरलेली आहे की मुंबईत राहणारे चाकरमानी खास सुट्टी टाकून कापणीच्या हंगामात जिताडा खायला गावी यायचे.

रायगडमधील जिताड्याच्या या चवीची भुरळ मोठ मोठ्या उद्योगपतींसह राज्यातील राजकीय नेत्यांनादेखील पडते. याशिवाय निवडणूक कोणतीही असो तिकीट कुणाला फायनल करावे हे शिक्कामोर्तब करण्याची ताकद याच जिताड्यात होती. आजच्या निवडणूक प्रचारातही जिताड्याचे कालवण, मटण महत्त्वाची भूमिका बजावते.

कोकणातील खाद्य संस्कृतीचे वैशिष्ट्य बनलेला जिताडा मासा खाडीतून नाहीसा होत चाललाय. खाड्यांतील जिताडा आणि इतर वैशिष्ट्यपूर्ण माशांच्या प्रजाती कमी होणे ही कोकणातील अर्थकारण आणि जैवविविधतेच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे.

रायगडच्या अलिबाग पेण व खारेपाट विभागात पूर्वी जिताडा मुबलक प्रमाणात मिळत होता. त्यामुळे त्याची किंमतदेखील कमी होती. आता कृत्रिम तळ्यातील संगोपनाचा खर्च वाढल्यामुळे साहजिकच जिताड्याची किंमत खूपच वाढलेली आहे.

जिताड्याचे अस्तित्व टिकून रहावे यासाठी रायगड जिल्ह्यातील अनेक स्थानिक मत्स्य व्यावसायिक धडपड करत आहेत. जिताड्याची वैशिष्ट्यपूर्ण चव आणि त्याची मागणी लक्षात घेऊन अलीकडे कृत्रिम तळ्यामध्ये त्याचे संगोपन केले जात आहे. पूर्वी आम्ही लहान असताना शेतात कापणीच्या वेळेस शेतातील पाण्यात जिताडे मोठ्या प्रमाणावर आढळत होते, मात्र आता जिताडे नजरेसदेखील पडत नाही. हे मत्स्यधन घटत आहे ही बाब चिंतेची असल्याचे धनंजय धुमाळ, स्थानिक दिवलांग पेझारी यांनी सांगितले. या वेळी बोलताना रमेश पाटील म्हणाले की फळांचा राजा म्हणून जस आंबा तसा माशांचा राजा जिताडा. पूर्वी खास मित्रपरिवार, नेतेमंडळी यांना जिताड्याची मेजवानी दिली जायची.

खाडीत, शेतात मिळणारा आणि कृत्रिम तळ्यातील जिताडा यांच्या चवीत जमीन अस्मानाचा फरक असल्याचे दिवलांग येथील मत्स्य व्यावसायिक दामोदर धुमाळ यांनी सांगितले.

### *बदलते वातावरण, प्रदूषणाचा परिणाम*

***कोकणातील बदलत्या वातावरणाचा जिताडा माश्यांच्या प्रजननावर प्रतिकूल परिणाम झालाय. खाड्यांमधील कांदळवने ही या माशाचा नैसर्गिक अधिवास आहेत, मात्र रायगड जिल्ह्यातील कांदळवने रासायनिक कंपन्यांमधून समुद्रात सोडल्या जाणाऱ्या रसायनमिश्रीत सांडपाण्याच्या विळख्यात सापडली आहेत. वाहून आलेला कचरा, पाण्यावर, चिखलावर तरंगणारे तेलतवंग यामुळे या माशांची अंडी घालण्याची ठिकाणे संकटात आली आहेत. याचा परिणाम म्हणजे खाडीत, शेतात आढळणारा जिताडा आता केवळ खोल समुद्रात आढळतो. केवळ जिताडाच नाही तर वाढते प्रदूषण, नियमबाह्य मासेमारीमुळे ४८ मत्स्य प्रजातींवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.***

## चिलठण शाळेला 'गोदरेज कॉर्बेर'कडून टीव्ही भेट

**चौक : प्रतिनिधी**

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून शैक्षणिक प्रगती होण्यासाठी गोदरेज कॉर्बेर सप्लाय चेन लि. कंपनीकडून चिलठण शाळेला मुख्याध्यापक शुभांगी मोरे यांच्या प्रयत्नाने टीव्ही भेट मिळाला आहे.

रायगड जिल्हा परिषदेची चिलठण प्राथमिक शाळा ही दुर्गम भागात आहे. शाळेत पिण्याचे स्वच्छ पाणी, शौचालय, मुलींना वेगळे प्रसाधनगृह, शाळेला दरवाजा, खिडक्यांना ग्रिल्स, विद्यार्थी पट संख्या वाढविणे यासाठी मुख्याध्यापक शुभांगी मोरे यांनी सरपंच मनीषा गायकर, उपसरपंच परशुराम गायकर, शाळा समिती अध्यक्षा पायल गायकर, सदस्य व ग्रामसेविका मनीषा म्हसे यांच्यामार्फत विशेष प्रयत्न केले. आज शाळेची प्रगती दिसू लागली आहे.

शाळेच्या शैक्षणिक प्रगतीची वाटचाल पाहून आणि विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण क्षेत्रात प्रगती होण्यासाठी गोदरेज कॉर्बेर सप्लाय चेन लि. कंपनीने सुमारे दीड लाख रुपये किमतीचा टीव्ही भेट दिला आहे. त्यामुळे विद्यार्थी आनंदित झाले. शाळेची प्रगती पाहून आम्ही शैक्षणिक साहित्याची मदत करू, अशी ग्वाही कंपनीकडून या वेळी देण्यात आली.



# ‘किवीं’नी पहिल्या डावात भारताला गुंडाळले

## ४६ धावांमध्ये खुर्दा; दिवसाखेर तीन बाद १८० धावा

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिली कसोटी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवली जात आहे. जेथे दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला आहे. पहिल्या डावात टीम इंडियाला १० विकेट्स गमावून केवळ ४६ धावा करता आल्या. ज्या खेळपट्टीवर १० भारतीय खेळाडूंनी मिळून ४६ धावा केल्या, तिथे न्यूझीलंडचा फलंदाज डेव्हॉन कॉनवेने शानदार ९१ धावा केल्या. कठीण खेळपट्टीवर कॉनवेने आक्रमक खेळ केली. दिवसअखेर त्यांच्या संघाने तीन बाद १८० धावा केल्या आहेत.



डेव्हॉन कॉनवे भारताविरुद्ध सलामीला आला. प्रथम त्याने टॉम लॅथमसोबत ६०हून अधिक धावांची भागीदारी केली. विल यंगच्या साथीने डाव पुढे नेला. ९१ धावांची खेळी खेळून तो माघारी परतला. यादरम्यान त्याने ११ चौकार आणि तीन षटकार मारले. कॉनवे चांगली फलंदाजी करत होता, मात्र अश्विनने त्याला बोल्ड केले. दिवसाचा खेळ संपेपर्यंत रचिन रवींद्र २२ आणि डॅरिल मिशेल १४ धावांसह खेळत होते. भारताकडून आतापर्यंत रविचंद्रन अश्विन, कुलदीप यादव आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसऱ्या दिवशी सामना १५ मिनिटे लवकर सुरू झाला आणि भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय कर्णधार रोहित शर्माचा हा निर्णय चुकीचा ठरला. भारतीय फलंदाजी एकदम कोसळली आणि संघाचे ११ खेळाडू ५० धावाही करू शकले नाहीत. खराब फलंदाजीनंतर टीम इंडियाची गोलंदाजीही खराब झाली.

न्यूझीलंडसाठी कर्णधार टॉम लॅथम आणि डेव्हॉन कॉनवे यांनी पहिल्या विकेटसाठी ६७ धावांची भागीदारी केली. लॅथम १५ धावा करून कुलदीप यादवचा बळी ठरला. यानंतर विल यंगसह कॉनवेने डाव सांभाळला. जडेजाच्या चेंडूवर ३३ धावा करून यंग बाद झाला. ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनने कॉनवेला आऊट करून भारताला तिसरे यश मिळवून दिले. कॉनवे १०५ चेंडूंत ११ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ९१ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला.

# मुलींचे क्रिकेट सराव शिबिर आणि संघ निवड चाचणी



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए) आयोजित १९ वर्षांखालील मुलींचे सराव शिबिर व संघ निवड चाचणी १९ व २० ऑक्टोबर रोजी खारघर येथील इनामपुरीच्या मैदानावर आयोजित करण्यात आली आहे.

१ सप्टेंबर २००६नंतर जन्मलेल्या मुलींसाठी हे शिबिर असणार आहे. या शिबिरासाठी रायगड जिल्ह्यातील सर्व मुलींनी क्रिकेटच्या पांढऱ्या गणवेशात व आवश्यक क्रिकेट साहित्यासह सकाळी ९.३० वाजता खारघर येथील इनामपुरी मैदानावर हजर राहायचे आहे.

सर्व खेळाडूंनी सोबत आधार कार्ड (ओरिजनल आणि फोटोकॉपी) व स्वतःचा एक पासपोर्ट साईज फोटो आणावा. क्रिकेट शिबिरासाठी सहभागी होण्याकरिता कोणतीही प्रवेश शुल्क आकारण्यात येणार नाही. या दोन दिवसीय शिबिरातून आरडीसीए १९ वर्षांखालील मुलींचा संघ निवडणार आहे, जो ऑक्टोबर महिन्यात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) तर्फे आयोजित आंतरजिल्हा निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होईल.

या शिबिराला आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक, उपाध्यक्ष राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी रोहित काळे (९६५३१२६८२३) यांच्याशी संपर्क साधावा.

# केदार जाधवचा एलएलसी संघ लिजेंड्स लीग क्रिकेट चॅम्पियन!

## इरफान पठाणच्या संघाचा सुपर ओव्हरमध्ये पराभव



**श्रीनगर : वृत्तसंस्था**

केदार जाधवच्या नेतृत्वाखालील सदर्न सुपर स्टार्स (एलएलसी)ने लिजेंड्स लीग क्रिकेट २०२४चे विजेतेपद जिंकले. अंतिम सामना अतिशय रोमांचक होता, ज्यात सुपर ओव्हर खेळला गेला. एलएलसीने फायनलमध्ये इरफान पठाणच्या नेतृत्वाखालील कोणार्क सूर्या ओडिशा (केएसओ)चा पराभव केला.

श्रीनगरच्या बक्षी स्टेडियम येथे झालेल्या या सामन्यात एलएलसी संघाने प्रथम फलंदाजी करताना १६४ धावा केल्या. प्रत्युत्तरात केएसओ संघदेखील २० षटकांत नऊ गडी गमावून १६४ धावाच करू शकला. केएसओसाठी युसूफ पठाणने दमदार खेळी खेळली. त्याने ३८ चेंडूत सहा चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने ८५ धावा केल्या.

एलएलसीला शेवटच्या दोन षटकांत ३५ धावांची आवश्यकता होती. युसूफने १९व्या षटकात पवन नेगीला धारेवर धरले. त्याने या ओव्हरमध्ये चार षटकार आणि एक चौकार मारत २८ धावा केल्या. यानंतर चतुरंगा डी सिल्वाच्या शेवटच्या षटकात विजयासाठी सात धावा हव्या होत्या, पण केएसओ केवळ सहा धावाच करू शकला. युसूफ पठाण शेवटच्या चेंडूवर धावबाद झाला. अशा स्थितीत सामना टाय होऊन सुपर ओव्हरमध्ये पोहचला.

सुपर ओव्हरमध्ये केएसओने १३ धावा केल्या. प्रत्युत्तरात एलएलसीच्या मार्टिन गुप्टिलने सुपर ओव्हरच्या पहिल्या दोन चेंडूंवर दोन षटकार मारून केएसओच्या आशा धुळीस मिळवल्या.

# सनरायझर्स हैदराबादचा प्रशिक्षक स्टेनची आगामी हंगामातून माघार

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५पूर्वी सनरायझर्स हैदराबाद संघाला मोठा धक्का बसला आहे. या संघासाठी वेगवान गोलंदाजी प्रशिक्षकाची भूमिका बजावणाऱ्या डेल स्टेनने एक मोठा निर्णय घेत संघातून बाहेर पडण्याची घोषणा करून सर्वांना आश्चर्यचकित केले आहे.

आयपीएलच्या आगामी हंगामासाठी सर्व फ्रँचायझी त्यांच्या खेळाडूंबाबत रणनीती आखत असताना काही संघांनी त्यांच्या कोचिंग स्टाफमध्ये बदल केले आहेत दरम्यान, डेल स्टेनने सनरायझर्स हैदराबाद संघातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केलेल्या एका पोस्टद्वारे ही माहिती दिली



सनरायझर्स हैदराबाद संघाने डेल स्टेनची डिसेंबर २०२१मध्ये वेगवान गोलंदाज प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर त्याने सलग तीन हंगाम ही जबाबदारी सांभाळली. गेल्या आयपीएल हंगामात स्टेनने हैदराबाद संघाचा नवा कर्णधार पॅट कमिन्ससोबत काम केले, ज्यामध्ये संघ अंतिम फेरीत पोहचण्यात यशस्वी ठरला होता.

स्टेनने एक्सवर पोस्ट करताना लिहिले की, मला आयपीएलमध्ये गोलंदाजी प्रशिक्षकाची जबाबदारी स्वीकारण्याची संधी दिल्याबद्दल मी सनरायझर्स हैदराबाद संघाचे खूप आभार मानू इच्छितो, पण मी आयपीएल २०२५साठी परत येणार नाही, कारण मी दक्षिण आफ्रिकेतील एसए टी-२०मध्ये सनरायझर्स इस्टर्न केपसोबत काम करणे सुरू ठेवणार आहे. एसए टी-२०मध्ये दोनदा जेतेपद जिंकणाऱ्या सनरायझर्स इस्टर्न केप सलग तिसऱ्यांदा ट्रॉफी जिंकवण्याचा प्रयत्न करणार आहे.

# दिल्लीच्या प्रशिक्षकपदी दोन नावे चर्चेत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५च्या मेगा लिलावापूर्वी दिल्ली कॅपिटल्सच्या कोचिंग स्टाफबाबत एक मोठे अपडेट समोर आले आहे. मुख्य प्रशिक्षक रिकी पॉंटिंगने साथ सोडल्यानंतर दिल्ली कॅपिटल्स दोन माजी भारतीय खेळाडूंना नवे प्रशिक्षक बनवू शकते.

रिपोर्ट्सनुसार माजी क्रिकेटपटू हेमांग बदानी दिल्ली कॅपिटल्सचे नवे मुख्य प्रशिक्षक बनू शकतात. याशिवाय त्यांचे सहकारी खेळाडू वेणुगोपाल राव यांची संघाच्या क्रिकेट संचालकपदी नियुक्ती केली जाऊ शकते. बदानी व राव हे चेन्नई लीगमध्ये एमआरएफसाठी एकत्र खेळले आहेत. याशिवाय दोघांमधील परस्पर समन्वय खूपच उत्कृष्ट आहे. दिल्ली कॅपिटल्सने या दोघांना उर्वरित सपोर्ट स्टाफ नियुक्त करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिलंय. अनेक वर्ष दिल्लीचे प्रशिक्षक राहिलेल्या रिकी पॉंटिंगसारख्या दिग्गजाची जागा घेणे सोपे नाही, मात्र ‘क्रिकबझ’च्या मते फ्रेंचायझीने मोठ्या नावांऐवजी बदानी व राय यांना सपोर्ट स्टाफमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. राव हे दिल्लीकडून खेळाडू म्हणूनही खेळलेत.

# शुन्यावर बाद, तरीही विराटने टाकले धोनीला मागे

## भारताकडून सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळणारा दुसरा खेळाडू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिग्गज क्रिकेटपटू विराट कोहलीने भारतीय संघासाठी एक मोठा विक्रम केला आहे. तो भारताकडून सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळणारा दुसरा खेळाडू बनला. विराटने या बाबतीत माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीचा विक्रम मोडला आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर कसोटी सामना खेळला जात आहे. या सामन्यात विराट कोहली तब्बल आठ वर्षांनंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला, मात्र टीम मॅनेजमेंटचा हा प्रयोग सपशेल अपयशी ठरला. विराट या सामन्यात ९ चेंडूत



भोपळाही न फोडता बाद झाला.

विराट कोहलीचा भारतासाठीचा हा ५३६वा आंतरराष्ट्रीय सामना आहे. माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीने टीम इंडियासाठी ५३५ सामने खेळले आहेत. अशा प्रकारे भारतासाठी सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याच्या बाबतीत विराट आता एमएस धोनीच्या पुढे गेला, परंतु विराट अजूनही ‘क्रिकेटचा देव’ म्हटल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरपेक्षा तब्बल १२८ सामन्यांनी मागे आहे.

सचिन तेंडुलकरने भारतीय संघासाठी सर्वाधिक ६६४ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. चौथ्या क्रमांकावर राहुल द्रविड आहे. त्याने भारतासाठी ५०४ आंतरराष्ट्रीय सामने खेळले.

या यादीत टीम इंडियाचा सध्याचा कर्णधार रोहित शर्मा पाचव्या स्थानावर आहे. त्याने आतापर्यंत टीम इंडियासाठी ४८६ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.

# रियाधमध्ये होऊ शकते आयपीएल लिलाव प्रक्रिया

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५साठीचा मेगा लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. वृत्तानुसार लिलावाचे ठिकाणही निश्चित करण्यात आलंय. या वेळी आयपीएलचा मेगा लिलाव सौदी अरेबियाची राजधानी रियाधमध्ये आयोजित केला जाऊ शकतो, मात्र भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने याची अद्याप अधिकृत घोषणा केलेली नाही.




आयपीएलचा शेवटचा लिलाव दुबईत पार पडला होता, परंतु या वेळी सौदी अरेबियामध्ये लिलाव होऊ शकतो. मेगा लिलावासाठी आणखी शहरेदेखील शर्यतीत होती. लंडन आणि सिंगापूरचाही विचार केला गेला. ‘स्टारस्पोर्ट्स’ने दिलेल्या वृत्तानुसार लिलावासाठी रियाधची निवड करण्यात आली आहे. रियाधचा टाइम झोन भारताच्या दृष्टीने योग्य मानला जातो. यासोबतच प्रसारणाच्या बाबतीतही सुलभता येईल.

लिलावाचे ठिकाण फायनल केले जात आहे. तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. सर्व १० फ्रँचायझींशी संबंधित अधिकारी लिलावासाठी रियाधला पोहचतील. त्यांच्यासोबत जिओ आणि डिस्ने स्टार्सची एक मोठी टीमही जाणार आहे. हा लिलाव जिओ आणि स्टारवर थेट प्रसारित केला जाऊ शकतो.

मेगा लिलावापूर्वी सर्व संघांना रिटेन केलेल्या आणि रिलिज केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करावी लागेल. सोशल मीडियावर रोहित शर्माच्या नावाची खूप चर्चा आहे. गेल्या हंगामात मुंबई इंडियन्सने रोहितला कर्णधारपदावरून हटवले होते, परंतु ‘इंडियन एक्स्प्रेस’च्या बातमीनुसार मुंबई रोहितला रिटेन करू शकते. त्याच्यासह सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या आणि जसप्रीत बुमराह यांनाही रिटेन केले जाऊ शकते.

### रिटेन खेळाडूंची यादी करावी लागेल सादर

सर्व संघांना ३१ ऑक्टोबरपूर्वी रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करायची आहे. ही यादी त्यांना बीसीसीआयकडे सादर करावी लागेल. यानंतर लिलावाची वेळ येईल त्या वेळी अनेक मोठे खेळाडू संघ बदलू शकतात.

# आयपीएल : मेगा लिलावापूर्वी खेळाडूंना रिटेन करण्याच्या नियमांमध्ये बदल

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५च्या मेगा लिलावापूर्वी खेळाडूंना रिटेन करण्याच्या नियमांमध्ये थोडा बदल करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) नुकतेच आयपीएल २०२५साठी रिटेन्शनचे नियम जाहीर केले होते. यामध्ये आता थोडा बदल करण्यात आला आहे. हे अधिकृतपणे झालेले नाही. ‘ईएसपीएन क्रिकइन्फो’च्या अहवालात असा दावा करण्यात आला आहे.

अहवालानुसार आयपीएल २०२५च्या मेगा लिलावापूर्वी संघ त्यांच्या पर्समधून रिटेन केलेल्या खेळाडूंना कितीही रक्कम देऊ शकतात. या रिपोर्टनुसार सनरायझर्स हैदराबादने स्फोटक फलंदाज हेनरिक क्लासेनला १८ कोटी नव्हे, तर २३ कोटी रुपये देण्याचे मान्य केले आहे. हैदराबाद हेनरिक क्लासेनला २३ कोटी, पॅट कमिन्सला १८ कोटी आणि अभिषेक शर्माला १४ कोटी रुपयांना रिटेन करू शकतात.

बीसीसीआयने नियम जाहीर केले होते, तेव्हा खेळाडूंना रिटेन करण्यासाठी १८ कोटी, १४ कोटी, ११ कोटी, १८ कोटी आणि १४ कोटी रुपयांचा स्लॅब बनवला होता, तर अनकॅप्ड खेळाडूसाठी चार कोटी रुपये निर्धारित करण्यात आले होते, परंतु आता बीसीसीआयने म्हटले आहे की, संघ पहिल्या पाच खेळाडूंसाठी ७५ कोटी रुपये देऊ शकतात, ज्यामध्ये कोणत्याही खेळाडूला कितीही रक्कम देता येऊ शकते. सनरायझर्स हैदराबाद या तीन खेळाडूंशिवाय ट्रॅव्हिस हेड आणि नितीश रेड्डी यांना रिटेन करण्याची चर्चा सुरू आहे. हैदराबादने या तीन खेळाडूंवर ५५ कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. अशा स्थितीत संघाच्या खिशात आणखी २० कोटी रुपये शिल्लक राहतील. ते ट्रॅव्हिस हेड आणि नितीश रेड्डी यांना प्रत्येकी १० कोटी रुपये देऊन कायम ठेवू शकतात, असे वृत्त आहे.

### अशी होईल रकमेची कपात

या अहवालात हे सांगण्यात आले आहे की, संघ त्यांचे ७५ कोटी रुपये कसेही खर्च करू शकतात. बीसीसीआयने स्पष्ट केले की, जर तुम्ही पाच कॅप्ड रिटेन्शन घेतले तर तुमच्या एकूण १२० कोटी रुपयांच्या पर्समधून ७५ कोटी रुपये कापले जातील. जर तुम्ही अनकॅप्ड खेळाडू निवडला तरी पर्समधून ७९ कोटी रुपये कापले जातील. जर एखाद्या संघाने चार खेळाडूंना रिटेन केले, तर त्यांच्या पर्समधून ६४ कोटी रुपये कापले जातील.

## भारतीय खेळाडू श्रेयांका पाटीलकडून पाक कर्णधाराला संदेशासह चित्र भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाची अष्टपैलू खेळाडू श्रेयांका पाटील हिने खेळभावना दाखवताना पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना फातिमाला एक भेट दिली. फातिमाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर याची झलक शेअर केली आहे.

विश्वचषकादरम्यान पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना फार चर्चेत राहिली. २२ वर्षीय फातिमाच्या नेतृत्वातील पाकिस्तानने पहिल्या सामन्यात श्रीलंकेला नमवून विजयी सलामी दिली, पण त्यानंतर सनाला तिच्या वडिलांचे निधन झाल्याने मायदेशी परतावे लागले. त्यामुळे तिला ऑस्ट्रेलियाविरुद्धचा सामना खेळता आला नाही, परंतु न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यापूर्वी ती पुन्हा यूएईत दाखल झाली.

श्रेयांका पाटीलने फातिमाला एक चित्र भेट दिले. यामध्ये लिहिले आहे की, ‘तुला जे आवडेल ते तू कर... श्रेयांका ३१.’ श्रेयांकाने दिलेली ही भेट चाहत्यांसाठी शेअर करत फातिनाने म्हटले की, या अप्रतिम गिफ्टसाठी आणि चांगल्या संदेशासाठी तुझे आभार श्रेयांका!

# मानेच्या समस्येमुळे गिल बंगळुरू कसोटीतून बाहेर



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील कसोटी मालिकेतील पहिला सामना बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला जात आहे. सामन्याचा पहिला दिवस पावसामुळे वाया गेला होता. दुसऱ्या दिवशी या सामन्यासाठी भारतीय कर्णधार रोहित शर्मा याने जेव्हा प्लेइंग ११ जाहीर केली, तेव्हा यामध्ये युवा फलंदाज शुबमन गिलचे नाव नव्हते.

गिलच्या मानेमध्ये समस्या आहे. यामुळे तो निवडीसाठी उपलब्ध नव्हता. त्याच्या अनुपस्थितीत मुंबईचा फलंदाज सरफराज खानला प्लेइंग ११मध्ये संधी मिळाली. नाणेफेक झाल्यानंतर बीसीसीआयने एक्सवर एक पोस्ट शेअर करत गिलच्या मानेमध्ये समस्या असल्याचे बोर्डाने सांगितले. याच कारणामुळे तो न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात खेळत नाही.

शुबमन गिलने गेल्या काही काळापासून भारतीय संघासाठी दमदार कामगिरी केली आहे, पण पूर्णपणे तंदुरुस्त नसल्यामुळे तो बंगळुरू कसोटीतून बाहेर पडला आहे. गिल तंदुरुस्त झाल्यास दुसऱ्या कसोटी सामन्याच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये त्याचा निश्चितपणे समावेश होईल.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगु ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com